# सोनचाफा

# सोनचाफा

## माझ्या काही निवडक कविता

आर वाय देशपांडे

Savitri Foundation

सोनचाफाः माताजींनी दिलेले नावः अतिमाणसाची मानसिक परिपूर्णता
Supramental Psychological Perfection

First Edition
17 November 2025

Published by
**Savitri Foundation**
875, Sector 17B,
Gurugram, Haryana – 122001
Ph: +91124-4280241
E-Mail: info@savitri.in
Website: http://www.savitri.in




साती लोकी धगधगे ह्या सोनचाफ्याची प्रदीप्त ज्योत,
तेजस्वी अद्भुतता युगांच्या वचनांची येई इथेही धावत;

आधी फोफावला होता वृक्ष तो आभाळाच्या उद्यानात,
सुवर्ण प्रकाशाने वाढविलेला, पावसाच्या सदैव हर्षात;

सुरभी सोनचाफा हा पसरवे दऱ्याखोऱ्यात, भरवस्तीत,
न मिटणारा सर्जनशील आनंद, त्याचे अद्वितीय स्मित;

मृत्यूहीनत्वाचे जीवन आविष्कार अग्नीचा लखलखीत,
शुभ घेई प्रखर देहरूप चैतन्याच्या अनिर्बंध संकल्पनेत;

पहा, येती नाना पक्षी गात गात, जसे येती शब्द विहंगत,
आणिला त्यांनी गुणगुणाट निर्झराचा वाहत्या काव्यात;

आले सौरधन दगडामातीच्या अगदी लहानशा घरात,
आणि झाली पूर्ण विधात्याची योगतपश्चर्या फलित.

१८ ऑक्टोबर २०२५





प्रदीप्त ज्योतः Ptadīpta Jyota

Motionless like the light of a lamp in a windless place

यथा दीपो निवातस्थो

The Gita 6:19

# थोडीशी भूमिका



देव आला देवाच्या घरी
उभारली नवी पंढरी।

एके सकाळी ह्या दोन ओळी एकदम आल्या, सहजतेने आल्या. कोठून कशा याची थोडीही कल्पना नव्हती. ऑरोविल येथील मातृमंदिराची प्रतिमा मात्र डोळ्यासमोर सारखी उभी होती, स्वप्नातील नवी नगरीः उभारली नवी पंढरी. पण नंतर काही दिवस त्या ओळी तशाच रेंगाळत राहिल्या. कसे घडले? सांगणे कठीण आहे. घडले हे मात्र निश्चितच. त्याचे मोठेपण वाढत गेले, वाढतच गेले. ह्या ठिकाणी काहीतरी विशेष वाटत होते. अत्यंत खोलवर गंभीर आणि अर्थपूर्ण असे जाणवू लागले. काहीतरी घडणार याची चिन्हे दिसू लागली आणि लगेच दोन तीन दिवसानंतर सर्वच्या सर्व पहिली कविता एकदम आकाराला आली. मराठीत लिहिण्याचा सराव

अजिबात नव्हता आणि मनात एकप्रकारची साशंक भीतीही होती. तरीदेखील हा चमत्कार झाला. कुणाच्या ध्यानीमनी होते ते? बहुतेक कुठेतरी ठरलेले असावे असे वाटते. तरी ह्यातून काहीतरी थोर निश्पन्न होण्याची खात्री बळकट होऊ लागली.

लगेच ती कविता जाणकार चारचौघांना पाठविली, ब्लॉगवर प्रकाशित केली, thewindsofwonder.org/. सगळ्यांकडून प्रतिसाद प्रोत्साहक होता. तिचे लयबद्ध गायनही झाले. त्या गोडव्यात पांच सात कविता सरसर आल्या. काही कवितांचे इंग्रजीतून भाषांतरही झाले. आणि वाटले आपण पंचवीसची मजल गाठावी. त्यात एकप्रकारची परिपूर्णता राहील. ह्या प्रकारच्या शैलीचे पक्केपणही नजरेस येईल, स्थापितही होईल. २६ जानेवारी २०२५ ते ३ एप्रिल २०२५ ह्या काळात प्रकटलेल्या रचना पाहता यशस्वीपणाची निश्चिन्तता पटली. उल्हास वाढला.

खरे म्हणजे हे इथेच का थांबवावे हा प्रश्न डोळ्यासमोर दिसू लागला. पण त्याचे कारण साधे आणि सरळ आहे. सोपे आहे. कवितांची रचना एकाच साच्यात पडू नव्हे हे उत्कटतेने वाटू लागले. तेच ते भाव पुनरावृत्त होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. निराळी शैली आणि निराळी स्फूर्ती व प्रतिभा असाव्यात ह्याची जाणीव प्रकर्षाने झाली. पुढे कसे घडेल हे तेंव्हा सांगता येत नव्हते. नवीन आविष्कार यातच स्फुरण आणि काव्याची सफलता सामावलेली आहे याचा पूर्ण बोध मनात होता.

मराठीतून काव्य लिहिणे हे मला तेवढे सोपे वाटले नाही. कधीच काहीही लिहिले नव्हते आणि हा प्रयास, ही हिम्मत, हे धाडस, आपल्या धैर्याच्या पलीकडचे तर नाही ना हे खटकू लागले. आत्मविश्वास तसा जबरदस्त नव्हता. त्यात मराठी टंकलिखाण अवजड आणि कष्टाचे. इंग्रजी कीबोर्ड वरून देवनागरी लिपीत लिहिताना सरळपणाचा स्वाभविक ओघ येत नव्हता. इंग्रजीतून जे सहज दहा मिनिटात होते तेथे अर्धा तासही लागतो.

पण त्याचवेळी उत्साहपूर्वक सहाय्यही मिळाले. त्यात विशेष उल्लेख करावा लागेल तो म्हणजे माझे नाशिकचे अनुभवी आणि तज्ञ स्नेही अरूण खोंडे यांचा. जसजशा कविता आल्या तसतशा मी त्या त्यांना पाठवू लागलो. त्यांनी मराठीचे केवळ ह्र्स्व-दीर्घच पाहिले नाही तर इथेतिथे अचूक शब्दांची निवड आणि भावसूचनाही केल्या.

पण सर्वात मोठी गोष्ट त्यांनी केली ती म्हणजे प्रस्तावनाच्या बाबतीत. नाशिकचे श्रीयुत स्वानंद बेदरकर या महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक, समीक्षक, संपादक आणि वक्ते यांच्याशी परिचय घडवून आणला. त्यांच्याशी संपर्क साधून त्यांनी हे मोठे आणि प्रशंसनीय यश मिळविले. त्याबद्दल मी त्यांचा कृतज्ञ आहे.

श्री बेदरकर यांनी लिहिलेली प्रस्तावना अप्रतिम आहे. प्रगल्भ आहे. अभ्यासपूर्वक आहे. मर्म ओळखणारी आहे. उद्याची कविता कशी असावी हे सांगणारी आहे. मराठीत नवे दालन उघडण्याच्या दिशेने नेणारी आहे. त्यात सर्व सार्थकता आली. एवढ्या चटकन लिहिली. या उत्स्फूर्त आणि प्रांजल सन्मान-पुरस्काराबाबतीत मी ह्या प्रतिष्ठिताचे हृदयपूर्वक आभार मानतो. धन्यवाद. ब्लॉगवर आलेल्या प्रतिक्रिया करणाऱ्यांचेही अनेक अनेक आभार.

खरे म्हणजे, शेवटी, हे सर्व करवून घेणाऱ्यांचेच अनंत आभार. कृतज्ञता व्यक्त करण्याचा सर्वोत्तम मार्ग असेल तर तो फक्त आनंदी असण्याचा. त्याच्या प्रती हाच आनंदाचा सोहळा. बेदरकर कवितेतिल एक उतारा देतातः

आनंदाचा प्रासाद आनंदाच्या पायऱ्या
आनंदाचे पंख आनंदाच्याच भराऱ्या।

उसळे अथांग महासागर आनंदाने
वाढवीत लेवीत पर्वणीचे शुभ लेणे।

आनंदाचे अलंकार आनंदाची ख्याती
गगन तोकडे म्हणून पृथ्वीची महती।

आनंदाची प्रतिष्ठा यज्ञयाग रात्रंदिन
आनंदात अग्नितेजाचे उगम स्थान।

आनंद-अग्नि अमृतदेह ठरवे
साहसी आनंद दिव्य जीवन घडवे।

साहसी आनंद दिव्य जीवन घडवे. हे होणारच.

ते लिहितातः “सर्वसाधारणपणे मानवी जीवनात सुख आणि दुःख या दोन भावनांमध्येच आनंद शोधाची प्रक्रिया साधली जाते; मात्र आनंद हा या दोन्ही

भावनांच्या पलीकडे उभा असतो. ज्याला तो दिसतो तोच प्रतिभावंत त्याकडे धाव घेऊ शकतो. देशपांडे यांच्या प्रस्तुत संग्रहात ही त्यांची धाव स्पष्टपणे दिसते. संपूर्ण आयुष्य तत्त्वज्ञानाने मंडित असलेले देशपांडे मराठी कवितेसारखा ललित साहित्यप्रकार हाताळताना कुठेही अवजड होत नाहीत. त्या कवितेच्या शब्दांना पेलवतील, मानवतील अशाच आशयाने अवगुंठीत असणारे शब्द या कवितांच्या अंगोपांगी आहेत. एकूण पंचवीस कवितांचा हा संग्रह सृष्टी, मानवी जीवन, मानवेतर अवकाश यासंबंधी भाष्य करताना दिसतो. २६ जानेवारी २०२५ ते ३ एप्रील २०२५ या अतिशय छोट्या कालावधीतील या कविता आहेत. त्यामुळे एखाद्या अज्ञात शक्तीने त्या सलगपणे त्यांच्याकडून लिहून घेतल्या आहेत की काय, असाही प्रश्न येथे पडतो. भारतीय साहित्यशास्त्रात काव्यविषयक विवेचन खुप विस्ताराने झालेले आहे. त्यामध्ये विशिष्ट कालावधीत झालेल्या रचनांना प्रज्ञा-प्रतिभा यांच्या तराजूत तोलताना विशिष्ट भावसंयोजनाची मीमांसा केलेली आढळते. त्याचा आनंद या समग्र कविता वाचताना वाचकाला मिळतो. प्रत्येक कवीची आणि त्याच्या कवितेची स्वतंत्र परिभाषा आणि भूमिका असते. तो त्या परिभाषा-भूमिकेशी जर प्रामाणिक राहिला, तर ती कविता अधिकाधिक तरल आणि अंतर्वेधी होत जाते. अशा मार्गावर आर. वाय. देशपांडे यांचा हा संग्रह जाताना दिसतो.”

३ एप्रील २०२५च्या नंतर काय घडले? त्या २५ कवितानंतर? सतत सहा महिने निरनिराळ्या कविता येऊ लागल्या. २५०-३००चा आकडा प्रभावी वेगाने आला. नंतर मात्र ओघ विसावला. त्यातील बऱ्याचशा कविता सावित्री फॉउंडेशनने १५ ऑगस्ट २०२५ ह्या प्रसन्न मुहूर्तावर प्रसिद्ध केल्या, *पंचामृत* ह्या शीर्षकाखाली. त्यात दुसऱ्या काही इंग्रजी-संस्कृत-मराठीतीलही कवितांचा समावेश आहे. संग्रहाचा तपशील “पंचामृत” इथे पाहणेः

https://thewindsofwonder.org/2025/08/15/

*पंचामृत* ह्या काव्यसंग्राहात कविता जशा आल्या त्या साधारणपणे तशाच ठेवलेल्या आहेत, कुठे ओढाताण चढउतार आहेत तर कुठे लयबद्ध रसाळता. गर्भित भाव मात्र सगळीकडे आध्यात्मिक गूढ रहस्यात्मकतेचा गंभीर आणि लक्षणीय भविष्यवाणीकडे नेणारा. श्री अरविंदांच्या म्हणण्याप्रमाणे हे काव्य मानस निर्मितीच्या उंच उंच स्थळावरून येणारे हवे. ते मनाच्या वर, खूप उंचावर चढणाऱ्या अवस्थांमधून

येणारे असावे. उद्याची कविता तेथूनच येईल अशी त्यांची धारणा आहे. मराठी भाषेत हे अद्याप घडलेले नाही. वास्तविक आधुनिक मराठी कवितेला ते माहित देखिलही नाही. तिकडे जाण्याचा हा एक प्रयत्न आहे असे म्हणण्यास मात्र काही हरकत नसावी. कुठपर्यंत यशस्वी आहे हे काळच ठरवील. पण त्यातच त्याची सर्व समर्थकता सफलता आली आहे असेही म्हटले तरी चालेल.

जर हे एक इष्ट उद्दिष्ट असेल तर संपूर्ण रचनांमधून योग्य निवड करणे निश्चितच व्यावहारिक आणि उपयुक्त ठरू शकेल. *सोनचाफा – माझ्या काही निवडक कविता* हाच तो प्रयत्न. साठएक कविता इथे घेतल्या आहेत. शेवटच्या दोन कविता मूळच्या इंग्रजीतून लिहिलेल्या आहेत, खूप वर्षांपूर्वी. त्यांचा बांधा इतर कवितांपेक्षा वेगळा आहे. उदात्त आवाज आणि ओघ हे भारदस्त महाकाव्याचे वाङ्मयिन वैशिष्ट्य वैभवी ठरते. तीव्र उत्साह आणि धावता शब्दप्रवाह अशा वेगाने जातो की दूरचे जवळचे एकाच ठिकाणी येतात. ग्रीकमधील होमरची महाकाव्ये त्यांनी ओतप्रोत भरलेली आहेत; वास्तविक तोच त्यांचा निर्माता आहे, मोठ्या झेपेचा. ध्वनी कानाकोपऱ्यातून विश्वाच्या विशालतेपर्यंत घुमू लागतो. आधुनिक काळात अमेरिकन कवी व्हिटमन ते वैभव इंग्रजीत आणतात. मराठी किंवा भारतीय स्थानिक भाषांमध्ये तसे फारसे आढळत नाही. पण ते जोरकस रीतीने यावे हे भाषेच्या क्रियाशीलतेकरिता आवश्यक आहे. कृती आणि सर्जनशील अभिव्यक्ती ह्यांचा विकास महत्वाचा आहे. मागचे श्रेष्ठ प्रासादिक मधुर जरी असले तरी आपले चांगले ते पुढच्या महानतेच्या आड येता कामा नसावे. श्रेष्ठताच श्रेष्टतेला पुढे नेते. तीच पुढची पाऊलवाट, धावपट्टी.

ती उद्याची श्रेष्ठता कशी असावी ह्याचे अंतर्ज्ञानी मर्म श्री अरविंदांनी आपल्या *भविष्यातील काव्य* ह्या निबंधमाळेत शंभर वर्षांपूर्वीच भाकीत केलेले आहे, खुलासेवार सांगितले आहे. ते म्हणतातः

> वाढत्या अंतर्ज्ञानी मनाच्या युगात कवितेचा आदर्श आत्मा काय असू शकेल? वैदिक कवींना मंत्राचा अर्थ प्रेरित आणि प्रकट झालेले पाहणे आणि दूरदर्शी विचार असा होता. त्यात एक अनुभूती असते. देवत्वाचे आणि स्वतःचे, मनुष्याचे, निसर्गाचे, विश्वाचे, जीवनाचे, वस्तूचे, विचाराचे, अनुभवाचे आणि कृतीचे काही अंतरंग सत्य चिंतनशील परंतु आवश्यक

आधुनिक शब्दाचा वापर करतात. ते एका महान आत्म्याच्या लयीच्या पंखांवर आले होते; छंदच ते पंख. दृष्टीला श्रवणापासून वेगळे करता येत नाही. आपण ज्याला साक्षात्कार म्हणतो तो स्वतःमधील सत्याचे जगणे; तो देखील वेगळा करता येत नाही आत्म्यात त्याची उपस्थिती आणि आतील दृष्टी तसेच श्रवणाच्या अभिव्यक्तीच्या आधी किंवा सोबत असणे आवश्यक आहे. तेच तेजस्वी शब्दाचे रूप धारण करतात. मंत्र हृदयातून जन्माला येतो आणि विचारशील मनाद्वारे त्या शाश्वत देवत्वाच्या रथात आकार घेतो किंवा एकत्रित केला जातो. त्याचे सत्य एक रूप आहे. कवी-द्रष्ट्याचे वचन ऐकणाऱ्या योग्य बाह्य श्रोत्याच्या मनातही, तर हे तिघे एकत्र होतात. अंतर्मन सत्याचे दर्शन श्रवणासह असले पाहिजे, मनाने त्याच्या अंतर्मन आत्म्याचा ताबा घेतला पाहिजे आणि आत्म्याकडे त्याचे येणे हे शब्दाच्या लयबद्ध संदेशासह आणि मनाने सत्याचे दर्शन घेऊन किंवा लगेचच अनुसरण करून असले पाहिजे. हे वर्णन गूढ वाटेल, तरी खरोखर महान कवितेच्या सर्व उच्चतम उद्रेकांवर लागू केले जाऊ शकते. परंतु कविता फक्त तेव्हाच मंत्र आहे जेव्हा ती अंतर्मन सत्याचा आवाज असते आणि त्या सत्याच्या लय आणि भाषणाच्या सर्वोच्च शक्तीमध्ये समाविष्ट असते. वेद आणि उपनिषदांच्या प्राचीन कवींनी मंत्र उच्चारण केले ते सर्वात अंतरंग आणि जवळजवळ गुप्त सत्य आहे ते पाहण्यासाठी, ऐकण्यासाठी आणि बोलण्यासाठी. प्रयत्न करत ते स्वतःला त्याच्या जन्मजात आत्मिक लय आणि मानवाच्या हृदयातील पवित्र अग्नी, दिव्य अग्निने प्रक्षेपित केलेल्या त्यागाच्या वाणीचा वापर किंवा शोध घेत असत. मंत्र हा एक थेट आणि सर्वात उच्च, सर्वात तीव्र आणि सर्वात दैवी भरीव लयबद्ध शब्द आहे. तो एक अंतर्ज्ञानी आणि प्रकटीकरणात्मक प्रेरणा मूर्त रूप देतो. मनाला स्वतःच्या दृश्याने आणि उपस्थितीने, गोष्टींच्या अंतरंग वास्तवाने आणि त्याच्या सत्याने आणि त्याच्या दिव्य आत्मरूपांनी, जिवंत सत्यापासून जन्मलेल्या देवतांनी, मंत्रांना प्रेरित करतो. ही एक सर्वोच्च लयबद्ध भाषा आहे ती प्रत्येकामध्ये स्वतःच्या अनंततेचा प्रकाश आणि आवाज आणते.

(संदर्भः https://incarnateword.in/sabcl/9/the-ideal-spirit-of-poetry)

हा श्रेष्ठतेचा पल्ला गाठण्याकरता मराठी भाषा समृद्ध आहे का, ते आव्हान ती स्वीकारू शकेल का, हा प्रश्न उद्भवणे साहजिकच आहे. आज तरी ते दिसत नाही. पण ह्याचा अर्थ असा नाही की ते शक्य नाही. अमृताच्या पैजा जिंकणारी मराठी त्याच्याकरता तयार होऊ शकते. त्यातच तिची पूर्तता आहे. ती आपल्याला आढळून येते थोडीशी तुकारामांच्या "आनंदाचे डोही आनंद तरंग | आनंदची अंग आनंदाचे". ते तेंव्हा तैत्तिरिय उपनिषदच सांगतात. पण पहिल्या दोन ओळीत जी अर्थ आणि भाव समृद्धी आहे ती तेवढी नंतर दिसत नाही. उपनिषदात ती कधीच दुबळी कृश होत नाही; वास्तविक तिचे आरोहण अजून अजून उंचीवर चढते, ती भरभराणीने वाढते.

> यतो वाचो निवर्तन्ते। अप्राप्य मनसा सह। आनन्दं ब्रह्मणो विद्वान्।
>
> ज्या शाश्वत आनंदापासून शब्दही काही न मिळवता मागे हटतात आणि मनही गोंधळून परत येते, त्या शाश्वत आनंदाला कोण जाणतो?

ज्ञानेश्वरीच्या बाबतीत म्हणायचे झाले तर, आध्यात्मिक वास्तवाच्या काही उच्च पातळींमधून येणाऱ्या श्रेष्ठ काव्यात लय, शब्दार्थ, आणि दृष्टी प्रेरणेची प्रामाणिकता घेऊन येतात. तिची सुरुवातच लगेच ते दाखवते. ही तिची प्रचितीः

> ॐ नमो जी आद्या। वेद प्रतिपाद्या। जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा ॥१॥
> देवा तूंचि गणेशु। सकलार्थमतिप्रकाशु। म्हणे निवृत्तिदासु। अवधारिजो जी ॥२॥
> हें शब्दब्रह्म अशेष। तेचि मूर्ति सुवेष। जेथ वर्णवपु निर्दोष। मिरवत असे ॥३॥

ध्वनीच्या मधुर स्वरात, निर्मितीमध्ये सर्वत्र त्याच्या गतिमानतेमध्ये प्रचलित आणि प्रबळ असलेल्या दृढ शब्दाच्या, अनंतकाळाच्या शांत मंदिर-घंटा वाजत असतांना ऐकू येतात. अद्भुत स्वर एकाच वेळी अदृश्य तारावर आदळतात आणि प्रतिध्वनी आणि अनुनाद आकाशात पसरत पसरत पसरतात; त्यात केवळ स्वर्गीयच नाही तर समृद्ध आणि सुवर्णमय जडत्वाचाही समावेश आहे. हीच मनाच्या उच्चार आणि भाषणाची शक्ती आहे. ज्ञानेश्वरीमध्ये ते एकाच वेळी आहे.

ज्ञानेश्वरीच्या शेवटी असलेले *पसायदान,* – ते एक परिपूर्ण चमत्कार आहे.

आतां विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें। तोषोनि मज द्यावें। पसायदान हें ॥१॥
जे खळांची व्यंकटी सांडो। तयां सत्कर्मीं रती वाढो। भूतां परस्परें जडो। मैत्र जीवांचें ॥२॥
दुरिताचें तिमिर जावो। विश्व स्वधर्म सूर्यें पाहो। जो जें वांच्छील तो तें लाहो। प्राणिजात ॥३॥
वर्षत सकळमंगळीं। ईश्वर निष्ठांची मांदियाळी। अनवरत भूमंडळीं। भेटतु या भूतां ॥४॥
चलां कल्पतरूंचे आरव। चेतना चिंतामणीचें गाव। बोलते जे अर्णव। पीयूषाचे ॥५॥
चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन। ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु ॥६॥
किंबहुना सर्वसुखीं। पूर्ण होऊनि तिहीं लोकीं। भजिजो आदिपुरुषीं। अखंडित ॥७॥

ह्यात पहिल्या सात ओव्या सर्वात शुद्ध अधिमानवामधून आल्या आहेत. लखलखीत चोवीस नंबरी सोन्याचे तेज तिथे आहे. कुणीतरी थोर योगी महाकवीने ते लिहून दिलेले आहे. मराठीतील कवितेच्या विजयी शक्यतेमध्ये त्या काव्याला कठीण विरळ पैजेचा पुरस्कार मिळवून देणारी हीच गोष्ट आहे. ती या भाषेत पुन्हा इतक्या प्रमाणात घडलेली नाही. पण येणारे काव्य तिकडचेच असावे. मराठी आत्मा त्यासाठी तयार आहे का? आज तरी तसे दिसत नाही.

तरी देखील *सोनचाफा – माझ्या काही निवडक कविता* तिकडे बघत आहे का हे विचारणे अवावगे अनुचित ठरू नये. आलेल्या एका कवितेबद्दल प्रतिक्रियेचे अजमान हे असे – "ही एक अस्सल खरी चोख नवीन मराठी कविता आहे." त्या उद्देशाने चटकन घेतलेली काही उदाहरणे येथे उद्धृत करणे योग्य ठरेल.

> दीप्तिवन्त वरुण इंद्र अग्नि सवितृ भग मित्र
> प्रसन्नतेचा ध्वनी घुमे नवगायत्रीचा सर्वत्र।
> उधळीत गुलाल येई शुभांगी मंगलदायिनी
> अमरत्व श्रेष्ठतेचे वाढवित ह्या मृत्युस्थानी।
>
> सूर्य उतरे समईच्या अखंड वातीत
> अस्तित्वाचे वास्तव्य घरा-घरात।

अगाध दिव्य अवतरे मृत्युप्रांते
आविष्कारे संकल्पिले होते ते।
देहाचे रूप बदले चेतनेप्रमाणे
विधात्याची इच्छा तिच्याच करणीने।

एके दिवशी काळी चेटकीणही होईल सोनेरी,
सोन्याची फुले वेचण्या सोनचाफ्याखाली.

सौंदर्य आहे स्मिताच्या गूढत्वाचे कारण,
तेचि करीन मृत्यूलाही साजेशे, शोभिवंत.

दृष्टीने पकडली दृष्टी, अग्नीचे आलिंगन,
जिंकले मृत्यूचे सगळे प्रबळ प्रांत प्रेमानेच.

जशी शोधे चांदणी परवलीचा शब्द चांदरातीत
सापडे तिला अग्नीतत्व स्थापिलेले पुरातनकाळी.

आविष्कार अग्नीचा, मृत्यूहीन मरणाधीनत्वात,
घेई देहरूप चैतन्याच्या अनिर्बंध संकल्पेनुसार.

आले पलीकडच्या नभातून थवेच्याथवे,
शेंदुरी नारिंगी चंदेरी सोनेरी आनंदाचे;
ऐकू येत आहेत स्तब्धतेचे सूर अंतरी,
तालांची चढउतार, संगीत सुमाधुर्याचे;
उधळीत गुलाल नाद जयजयकाराचा,
येई धन्यत्वाची महान प्रचिती क्षणोक्षणी.

येत आहे जवळ अनंताचा पळ राहण्या इथे सदैव,
घेई जन्म जेंव्हा अनादी दिव्यशक्ति पृथ्वीच्या गर्भी.

शून्यत्वाला ओलांडून रहस्यमय प्रेरणा की,
पोहोचतील अमरत्वाला हे हेम पर्वत पहाटेच.

मृत्यूहीनत्वाचे जीवन आविष्कार अग्नीचा लखलखीत,
शुभ घेई प्रखर देहरूप चैतन्याच्या अनिर्बंध संकल्पनेत;
पहा, येती नाना पक्षी गात गात, जसे येती शब्द विहंगत,
आणिला त्यांनी गुणगुणाट निर्झराचा वाहत्या काव्यात.

आनंदाच्या पंखांची झंजुमुंजु वेळी आली परदेशातुनि न्यारी हंसांची अचंबित झुंडच्याझुंड,
आणि भरला प्रकटीकरणाच्या घाईने अमर्याद शून्याचा आत्मा, उकलुनी त्यातले रहस्य.

काळ नव्हे, थोर अलौकिक प्रकाशमय मृत्यूने आपल्याला पुढच्या मार्गाने ऊज्वलतेकडे न्यावे. त्यात प्रकृतिधर्म आणि देहाची पार्थिवता चैतन्याला इच्छित असलेले स्वरूप घेतील. तेंव्हा एक देह मृत न होता दुसरा देह घेईल. उद्याचे आत्मज्ञान आणि काव्य हे अजमावून सांगेल. उदात्त आवाज आणि ओघ हे भारदस्त काव्याचे तेच वाङ्मयिन वैशिष्ट्य उंचावणारे प्रतिष्ठित वैभव ठरते. त्यात तीव्र उत्साह आणि धावता शब्दप्रवाह एकाच ठिकाणी येतात. ते जोरकस रीतीने यावे हे भाषेच्या क्रियाशीलतेकरिता आवश्यक आहे.

वेद आणि उपनिषदांच्या प्राचीन ऋषी-कवींनी मंत्र उच्चारण केले ते सर्वात अंतरंग आणि जवळजवळ गुप्त सत्य आहे ते पाहण्यासाठी. तिथे अंतर्ज्ञानी आणि प्रकटीकरणात्मक प्रेरणा मूर्त रूप घेते. ती एक सर्वोच्च लयबद्ध भाषा आहे. ती बनवलेली नव्हे अवतरलेली भाषा आहे, तिच्या अलंकारासहीत, तिच्या प्रगल्भ शब्दकोशातून, छंदशास्त्रातून, मूळ उद्गारासह.

खरे म्हणजे, अध्यात्म आता खूप पुढे गेलेले आहे, नव्या प्रखर चिद्विलासाच्या क्षमतेत, सामर्थ्यात, अग्नीच्या तेजाने दिव्य क्रियाशील शक्तीच्या विलासात, कार्यसिद्धीत, त्या उच्चतम प्रकृतीच्या समृद्धीत, त्या आविष्कारात. आशावादी दृष्टिकोनातून भविष्याच्या उज्वलतेतुन सांगायचे तर, त्यातच उन्मलीत होऊन नवीन काव्य वैभवी सौंदर्यशिल सृष्टीची निर्मिती करेल, ते अगम्य भोक्तेपण आस्वादिल. चिद्विलास हा चित्ताचा केवळ मनोरंजनाक खेळ किंवा लिला किंवा करमणूक नसून अनाकलनीय असले तरी प्रकटीकरणाचे प्रभावी कृतीदर्शन आहे.

श्रेष्ठतेचा असा पल्ला गाठण्याकरता मराठी भाषा संपन्न आहे का हा प्रश्न उद्भवणे साहजिकच आहे. आज तरी ते दिसत नाही. पण नाही म्हणून होणार नाही असे नाही. अमृताच्या पैजा जिंकणारी मराठी त्याच्याकरता तयार होऊ शकते. त्यातच तिची पूर्तता आहे. अपेक्षा आहे की त्याकरिता लागणारी वाग् तपश्चर्या केली जाईल.

अधिष्ठात्याने आपल्या क्रियावाण धर्मिणीला पाचारण करून येथे मृत्युलोकी दिव्यत्वाचा बहुगुणी होण्याकरिता तर हे सर्व प्रयोजन मांडले आहे. विस्तारित परिमाणांमध्ये सर्जनशीलता अनंताचे अनंत पैलू पाहील, अजून विकसित करील. तेच त्याचे बहुगुणत्व. ते आणणारे काव्य मग होते त्याची स्तुतीगाथा. तिथे वाढतो आश्चर्यकारक अभिनव आनंदविलास.

१७ नोव्हेंबर २०२५

# सामुग्री सारणी


| | |
|---|---|
| ०१: देव आला देवाच्या घरी | १ |
| २: साखरखेड्याची गोष्ट | २ |
| ०३: सप्तगंगेच्याकाठी बसली महापंगत | ३ |
| ०४: दृढावे संकल्प प्रेमाचा | ४ |
| ०५: गगनातला सूर्य अंगणात आला | ५ |
| ०६: माझे पंख आले आकाशातून | ६ |
| ०७: सावित्री प्रियतमाच्या शोधात | ७ |
| ०८: अग्निशिखेचे आगमन | ८ |
| ०९: जांभळा रंग गहिरा | ९ |
| १०: चांदण्याचे गुपित | १० |
| ११: येई क्रियाशील श्रेष्ठा | ११ |
| १२: आनंदाचा सोहळा | १२ |
| १३: सुवर्ण ज्योत | १३ |
| १४: स्वर्णप्रभा झळके ह्या भूमंडळी | १४ |
| १५: नांगरणीत सापडले अद्भुत भांडार | १५ |
| १६: नवमानवाचे आगमन | १६ |
| १७: हे स्वप्न मला कळले | १७ |

१८: अनेकत्वाची धारणा १९

१९: बकुळेची फुले २१

२०: जांभळीच्या खाली २३

२१: चेटकिणीचे भवितव्य २४

२२: वसंताच्या जल्लोशात २६

२३: आणे संदेश पक्षी माझा २७

२४: चैतन्याची तेजोमय उद्दिष्टे २८

२५: उमगले माझेपण माझे मलाच २९

२६: प्रशांतीची लयबद्ध रूपे ३०

२७: सगळे काही जाणणारे स्मित ३१

२८: अद्भुताचा उत्सव ३२

२९: ह्या प्रेमभरणीत एकच ध्यास ३३

३०: हायकू प्रकार ३५

३१: गरुडाची दृष्टी ४०

३२: गुणाकार मांडीला आणण्या सर्वांगी बहुत्व ४१

३३: अंधाराच्या गुहेत दिवा ४३

३४: अतिवास्तवता ४५

३५: गजबजलेले माझे लहानसे गाव ४७

| | |
|---|---|
| ३६: जांभळे स्वप्न वाऱ्याच्या झोतात | ४८ |
| ३७: रुसूनी बसली कवीता | ४९ |
| ३८: सतत वाहणारा झरा | ५० |
| ३९: टक भिडे टकेला | ५१ |
| ४०: गा, आणि देतील टेकड्या उत्तर | ५२ |
| ४१: माझी सावली | ५३ |
| ४२: जा, पावसा जा | ५४ |
| ४३: माझे दोन डोळे | ५५ |
| ४४: नदीच्या किनाऱ्यावर | ५६ |
| ४५: अद्भुत दमडीची कहाणी | ५७ |
| ४६: पुलकित धरणी | ५८ |
| ४७: तृप्ती सुभग जिवनाची | ५९ |
| ४८: जसे जाती शब्द खोल खोल | ६० |
| ४९: मृत्युप्रसंग | ६२ |
| ५०: पेटलेल्या ज्वाला | ६३ |
| ५१: एक वैश्विक साक्षात्कार | ६४ |
| ५२: धन्यत्वाची महान प्रचिती | ६६ |
| ५३: कोंडाणा | ६७ |

५४: शक्यतेच्या घरात ६८

५५: नसावा मावळणारा सूर्य ७०

५६: एका निःस्तब्ध रात्री ७१

५७: वाऱ्याची मंगलदायी झुळूक ७२

५८: स्मिताचा आनंद मधुर चंद्रमातून ७३

५९: अस्मानी रंगाची स्फूर्ती ७४

६०: अडगुळ मडगुळ सोन्याच कडगुळ ७५

६१: हे पर्वत ७६

६२: त्याचे ज्ञानाचे प्रकाशमन ७७

भूमिकेचे भाकीत ७९

एक रसग्रहण ८१

## ०१ः देव आला देवाच्या घरी

देव आला देवाच्या घरी
उभारली नवी पंढरी।

सोने उगवले शेतीभाती
प्रेमपूर्णेची दुथडा भरती।

रात्र नसे तरी दीपोत्सव
अद्भुत किमया की सर्व।

बहरले विशाल प्रांगण
चिवचिवाट हर्षाची गुणगुण।

सडा चोहीकडे प्राजक्ताचा
फोफावला वृक्ष आनंदाचा।

देव आला देवाच्या घरी
खायी आवडीची भाकरी।

चैतन्यनगरीचा देव
वाढवी समृद्धीचे वैभव।

२९ जानेवारी २०२५

# ०२: साखरखेड्याची गोष्ट

दाट वनराईच्या पलीकडे
आर्यभूषित साखरखेडे।

आनंदाचा गोडवा साखरेचा मळा
स्मित-आश्चर्यांचा सोहळा।

गुऱ्हाळी गर्दी देवगणांची
बैठक भरली सप्तस्वरांची।

हांक तुतारीची आसमंतात
थवेच्या थवे नील गगनात।

मिथ्यापण नसे मृत्यू नसे
अग्नितप्त देहची असे।

मधुरच सृष्टी माधुर्याची
नावीन्याकडे धांव उगमाची।

अद्भुत चौत्यपुरुष घडवी
आश्चर्याची तेजोमय थोरवी।

५ फेब्रुवारी २०२५

## ०३: सप्तगंगेच्याकाठी बसली महापंगत

इथे तिथे जाईजुई मोगऱ्याचा उल्हास
कोण म्हणे हा तर भ्रम, हा आभास?

खळखळा वाहे स्वरास्वरांचा आनंद
अजब महाकाव्याचा आल्हादिक नाद।

नसे खोटेपण, अस्तित्व हे केवळ सत्याचे,
माळरान दरीडोंगर, सगळीकडे, वास्तव्याचे।

अणुरेणूत तीच प्रतिष्ठा, तोच थोरलेपणा,
प्रफुल्लित जशी असे ही हसतमुख प्रेरणा।

सप्तगंगेच्याकाठी बसली महापंगत
आवडीचेच पक्वान्न, सुगंधी केशरभात।

दीप्तिवन्त वरुण इंद्र अग्नि सवितृ भग मित्र
प्रसन्नतेचा ध्वनी घुमे नवगायत्रीचा सर्वत्र।

उधळीत गुलाल येई शुभांगी मंगलदायिनी
अमरत्व श्रेष्ठतेचे वाढवित ह्या मृत्युस्थानी।

१३ फेब्रुवारी २०२५

## ०४: दृढावे संकल्प प्रेमाचा

खरेपणाची उत्तुंग उत्तुंग भरारी
ही तर नीळनभी वाढे सावली गोरी।

मोहोर असे गच्च थोरल्या वृक्षाचा
आल्हाद खोल खोल आंतरिकतेचा।

स्वैर रंगरंगीत पाखरांचा स्वानंद
नितळ धाव सरितेची निवांत।

नसे काही खंत, ईर्षा जगण्याची,
नसे थोडीही फिकीर वैभवाची।

क्रूर प्रबळ मृत्यू काय म्हणे:
“अहो माझेचि हे तर सर्व करणे”।

म्हणूनच महिमा कालगतीचा
आणि दृढावे ध्यास प्रेमभरतीचा।

भल्या नियतीची आश्चर्यात्मक तयारी
नभी-धरणी ही तर सावली सोनेरी।

१७ फेब्रुवारी २०२५

# ०५: गगनातला सूर्य अंगणात आला

गगनातला सूर्य अंगणात आला,
दिव्य झेपेने मोठा संकल्प साधला।

चमत्कार निश्चित, काही नव्हे अद्भुत
पहा, उमलला सोनचाफा वाळवंटात।

बहिरे जडत्व ऐके गाणे मधुर
शतकोटी स्वरांचे देखणे मंदिर।

होती प्रेरणा योगी अग्नीची
प्रखर तपश्चर्या वर्षावर्षांची।

गूढ शून्यात रूप प्रज्वलीत
कठोर दगडात लावली ज्योत।

संसार नसे पण प्रपंच करारी
अमर म्हणुनच मृत्यू स्वीकारी।

इथे तिथे सर्वत्र वास्तव्य त्याचे
देव तर फेडी जड ऋण धरतीचे।

१६ फेब्रुवारी २०२५

## ०६: माझे पंख आले आकाशातून

सुंदर माझे पंख आले आकाशातून
आनंदाचा रुबाबी छंद निळा घेऊन।

थवेच्या थवे उत्फुल्ल कल्पनेचे
शून्यातून वाढे विश्व संपन्नतेचे।

विस्मयच, भरारी उत्तरेस दक्षिणेस
चोहीकडे घेत घेत रसांचा रस।

मुग्ध झुळूक वाऱ्याची जांभळी
झरण्याची प्रसन्नता ती निराळी।

नदी नाले पुष्कर तळे अहो हे सर्व
बृहत् सागराचेच अनोखे कर्तृत्व।

रात्री रंगले चंदेरी स्वप्न तारकांचे
जागेपणी रसाळ काव्य उद्याचे।

आणि कालांतराच्या भाग्यप्रहरी
नवलाईचा गोडवा पसरे पसरे भूवरी।

२१ फेब्रुवारी २०२५

## ०७: सावित्री प्रियतमाच्या शोधात

रथाची चक्रे होती धावत धावत
प्रेमपुरीच्या आंतरिक शोधात।

राजवाडे शहरे खेडेपाडे तीर्थक्षेत्रे
पडले सर्व मागे, निकटचे, होत्रे-गोत्रे।

दऱ्याखोऱ्यातून नाद येई आनंदाचा
सारे सजले, जल्लोष उत्सवाचा।

हृदयी उजाडली उषा ही नूतन
दूरच्या भविष्याची प्रसन्नता घेऊन।

बहरला ऋतू मधुर हर्षाचा
संहार एकवटला वर्षावर्षांचा।

अनंतकाळ वाट पाहत होता,
या क्षणाची, मृत्युस न जुमानता।

मधुवतीस आलिंगले प्रियतमाने
न्हाऊन वाढले सौंदर्य सौंदर्याने।

२३ फेब्रुवारी २०२५

# ०८: अग्निशिखेचे आगमन

उंच टेकडीवर आहे माझे घर,
आजूबाजूला सारे हिरवेगार।

भली मोठी बाग पिछाडीला,
सगळीकडे पक्षी कुतुहलाला।

नजिकच प्रवाहांची खळखळ,
वाऱ्याच्या हाकांना होकार मंजुळ।

शब्द ऐकू येई भल्या अज्ञाताचा
अद्भुतातून प्रतिसाद मौल्याचा।

उलगडले रहस्य महान श्रुतीचे
दगडाच्या उरात इच्छाशक्तिचे।

निश्चित येईल ज्वाला जन्माला
ख्यातीचा संकल्प साधण्याला।

बांधला सप्तरंगी पूल आकाशात
आणि शिरे अग्निशिखा घराघरात।

२७ फेब्रुवारी २०२५

# ०६: जांभळा रंग गहिरा

जांभळा रंग गहिरा, जांभळी पहाट,
गोड हसे उत्कंठा बघत आशेची वाट।

उमले मोगऱ्याच्या शुभ्र कळ्या अंतर्देही
सुगंध भावनांचा कल्पकतेच्या ठायी।

प्रभात उगवे उदात्त भविष्याची
काय ठरविले होते पूर्वी घडे तेची।

नियतीने घेतली झेप अचानक मोठी
जुने प्राचीन गुणधर्म बदलण्यासाठी।

रात्रीचा न होई स्पर्श चंद्र-तारकांना,
क्रियाकृतीत खोटारेपणा येईचना।

ती बंधने, गळुनी पडे मनाच्या शृंखला,
मुक्तता नव्हे मोकळीक कर्तृत्वाला।

सूर्य उतरे समईच्या अखंड वातीत
अस्तित्वाचे वास्तव्य घरा-घरात।

२८ फेब्रुवारी २०२५

# १०: चांदण्याचे गुपित

आली अंगणात रुपेरी चांदणी
नेसुनि केशरी झगझगीत पैठणी।

माणिक-मोत्यांचा हार गळ्यात
मिष्किलता गालीच्या खळीत।

पैंजण पायात ठरवी कालगती
रागसुरात चाले चाले नियती।

भविष्यवाणीने सांगितली थोरवी,
वसे सर्वत्र ऋतंभरा, गावोगावी।

म्हणूनच आले मी अंगणात
चांदण्याचे गुपित उकलीत।

सांगे, आंतरात जशी मी जाई
प्रज्ञा सर्वठायी प्रत्ययास येई।

ऐश्वर्य लेवूनी ऐश्वर्यच वाढे
विपुलता इथे तिथे चोहीकडे।

७ मार्च २०२५

## ११: येई क्रियाशील श्रेष्ठा

येई क्रियाशील श्रेष्ठा ब्रह्मपुरीहुनि
योगियाचा महा आदेश घेऊनि।

गर्द उत्साहाने मोहरले आम्रवन
उत्स्फूर्त कोकिळ गायी गुणगान।

जणू काही पेरले तिनेच नकळत
सोनियाचे बी नांगरलेल्या शेतात।

उगवे अग्निसत्त्वाचे धनधान्य
नवतनुचे तेजःपुंज अमृत-अन्न।

येई विपुलता तिच्या आगमनाने
हर्षभरित सौंदर्य तिचेच असणे।

अगाध दिव्य अवतरे मृत्युप्रांते
आविष्कारे संकल्पिले होते ते।

देहाचे रूप बदले चेतनेप्रमाणे
विधात्याची इच्छा तिच्याच करणीने।

११ मार्च २०२५

# १२ः आनंदाचा सोहळा

आनंदाचा प्रासाद आनंदाच्या पायऱ्या
आनंदाचे पंख आनंदाच्याच भराऱ्या।

उंच उंच चढे शुभ्र आनंदाचे शिखर
धवलगिरीचे आनंदी पुण्य भूतलावर।

आनंदाच्या वस्तीत आनंदाचा सोहळा
उत्तुंग आनंद सर्वत्र सोन्याहून पिवळा।

उसळे अथांग महासागर आनंदाने
वाढवीत लेवीत पर्वणीचे शुभ लेणे।

आनंदाचे अलंकार आनंदाची ख्याती
गगन तोकडे म्हणून पृथ्वीची महती।

आनंदाची प्रतिष्ठा यज्ञयाग रात्रंदिन
आनंदात अग्नितेजाचे उगम स्थान।

आनंद-अग्निच अमृतदेह ठरवे
साहसी आनंद दिव्य जीवन घडवे।

१५ मार्च २०२५

# १३: सुवर्ण ज्योत

धडाडली संध्याकाळी ध्यानप्रांगणात
अचानक प्रशांत बुधवारी सुवर्णज्योत।

प्रगल्भ प्रेरणा बाळगून मोठ्या उद्याची
लखलखे सप्तभुवनीं क्रिया-चेतना तिची।

कल्पिले होते विसरलेल्या काळात
साकारे आता दिव्य योग-प्रतिज्ञेत।

गेले प्राकृतत्व जीर्ण होणाऱ्या वस्त्राचे
न होई शेवटी राख-भस्म ह्या देहाचे।

अतप्त तनु तो करुनि प्रज्वलित
प्रस्थापे हिरण्यप्रकाश अणुरेणूत।

अंधाराचे रूप भयानक करोनि नष्ट,
उघडे करी त्याचेही दडलेले वैशिष्ट्य।

कर्तृत्व अभिवन्दनीय मृत्यूलोके
सत्य जीवनच बाहेरी-आंतरिके।

१८ मार्च २०२५

## १४: स्वर्णप्रभा झळके ह्या भूमंडळी

सत्य नव्हते असे नाही, सर्वदा आहेच,
त्याचाच धर्म, मंगल रचना त्याचीच।

तो दाखवी मार्ग अनंताचा अनंतात
करुनि विस्तृत ब्रह्म अधिक विस्तृत।

घेतली सूत्रे हाती महत् अग्निप्रज्ञेने
श्रेष्ठत्व वाढविले, भविष्य भविष्याने।

स्वर्णप्रभा झळके ह्या साऱ्या भूमंडळी
सर्वत्र गढद आनंदी गुलाल उधळी।

विजयी ध्वज फडके शिखरावरी
महोत्सवाचा रंग उल्हासक शेंदुरी।

जीवन केवळच नव्हे, देहदेखील
ईश्वरत्व घनश्टेठायी जोपासेल।

हे अग्ने, धन दिव्य सृष्टीचे तुझेची
करविता भोक्ता अधिष्ठाता तूची।

२४ मार्च २०२५

## १५: नांगरणीत सापडले अद्भुत भांडार

नांगरणीत सापडले अद्भुत भांडार
पुरातन अग्निचा प्रज्वलित हुंकार।

येई ऐकू ध्वनि भूमिच्या गर्भातून
दिव्यत्व येत आहे दगडामातीतून।

होती प्रखर साधना युगायुगांची
ईश्वरी धारणा कृतीत आणण्याची।

संपल्या वेदना, क्लेश अज्ञानाचे,
गेले याचकपण, कठोरत्व मृत्युचे।

अवतरले चैतन्याचे प्रकाशमन
आनंदली पृथ्वी स्फूर्तीने न्हाऊन।

उद्यान उमललेले छंदांच्या लयीत
खळखळणाऱ्या ओढ्याचे रसाळ गीत।

प्रेरणा होती निखळ आविष्काराची
सार्थकता प्रशांत सृष्टि निर्मितीची।

२६ मार्च २०२५

# १६ः नवमानवाचे आगमन

अमृताचा ठेवा देहाची सार्थकता
खटाटोप मोठा धैर्य न ढळता।

अचानकच घडले एके दिवशी
दैवाच्या उंचावल्या राशीच्या राशी।

फुटला सोन्याला टवटवीत अंकुर
कधी न होणारे स्वप्न झाले साकार।

उद्याच्या आंतरात चिरकाल प्रकाश
धजे न तेथे अंधत्वाचा एकहि अंश।

कुंठल्या अपहृत नियतीच्या विवंचना
उद्ध्वस्त झाल्या खोटेपणाच्या रचना।

थोर चैतन्यरूपाचा अद्भुतच उत्सव
ऐका ऐका हो येत आहे नवमानव।

जवळचे दूरचे विशाल दृष्टि पाही
प्रकाशमयचही असे सगळे कांही।

३० मार्च २०२५

# १७: हे स्वप्न मला कळले

दुःख क्लेश न उरले अज्ञानाचे,
बंधने तुटली संकुल हृदयातील;

जाउनी सगळी बोचरी क्षुद्रता,
भूमिगत खोल सापडे रत्नभांडार;

काळोखाच्या गुहेत लख्ख उजेड,
हर्षित कोजागिरी असे जशी काही;

अवतरे सौंदर्यमयि आल्हादिनी,
डोले नुपूरांच्या झुणझुणित सृष्टी;

विद्रुपता कुठली नसे भावनामधे,
नसे कुठे तुच्छ खोटी प्रेम-माया;

फळाफुलांची भली भरगच्च बाग,
स्वर जाती दूर घेऊनी स्वैर पंख;

पण हे कोडे मला उमगलेच नाही, —
अश्व धावे अग्निबाणाच्या गतीने;

जे दिसते त्याच्या खूप पलीकडे,
ती दृष्टी पोहोचणारी योगचक्षूची;

अद्भुततेचा पुढे आहे मोठा विस्तार,
आनंदाचा, समृद्धीचा, दिव्यत्वाचा;

चैत्यनाची इच्छित रूपें करुनि धारण
आहेत तेथे ज्ञानीजन अग्नितेजाचे;

म्हणूनतर घेतला मी जन्म मृत्युलोकी
ध्येय घडवीत घडवीत गाठण्या पुण्यत्व;

अहो हीच तर सार्थकता निर्मितीची,
प्रयास नसे तो, आनंद आविष्काराचा.

१३ एप्रिल २०२५

# १८ः अनेकत्वाची धारणा

संसार करण्याकरिता तर आलो मी इथे
न बदलणारे ठेउनी बाजूस, माझे चिरत्व;

वाढती विपुलता सगळीकडे, वाढतेपण,
विस्तार सर्वही दिशां, चंदेरी प्रवाळ निळ्या;

सागरात उडी शोधण्या त्याची अद्भुतता,
अथवा मृत्यूमुळे आरोहण सप्त शिखरि;

ऐकता शांत नाद आंतरीचे अनाहत
खोल गहन होई निराकार स्तब्धता;

तिच्याही पलीकडे आहेत अनंत रूपे
येण्याकरता बाळगूनी अपेक्षा उत्साही;

अहो, मोठा खटाटोप तेच घडविण्यार्थ,
हा प्रपंच मांडीला वसविण्या अनेकत्व;

पसारा नव्हे, असावी आनंदाची विविधता,
कारणीभूत हीच इच्छा, घट्ट संकल्प;

शतपरिमाणांसह उभी असे ही रचना,
एकाच रंगातुनी फैलवीत असंख्य रंग रंग;

घेऊनि परम चैतन्य अंगी, हो, ठरे अंगी
चैतन्याचेचि अंश, प्रखर प्रज्वलतेचे;

संसार करण्याकरिता तर आलो मी इथे
न पडता संसारात साधण्या संसारत्व.

१५ एप्रिल २०२५

## १६: बकुळेची फुले

अबब, आलेली आहेत ही फुले तेथून जेथे
न पोहोचे ही दृष्टी, चपळ कल्पना देखील;

सुगंधी प्रांत तो हौसेच्याही पलीकडचा,
सौंदर्याचा, प्रेमाचा, अनोखा, अवर्णनीय;

येऊनि वाढविण्यास रात्रीची वैशिष्ट्ये
हिरेमाणिक चमकती तारकामंडळातही;

भावना आल्हाद दगडामातीत रहस्याचे
गाते गुणगान मधुर रसवंती, ती प्रवरा;

येई घेऊनि स्वाद अंधाराचा प्रासादिक
निर्मळतेच्या हृदयी झळझळे पावित्र्यच;

नाहीत रोग आजार द्वेषाचे वा त्या तुच्छतेचे,
नसे स्पर्श फुलांना कुठल्याही क्षुद्रतेचा;

पसरे त्याउलट साफल्यच रंगारंगातून,
वेगवान तंतूतंतूत नवचमत्कार, रेशमी;

लेशालेशाच्या ठायी, शब्दांच्या लयीत,
रूपारूपात परिमल मधुर शुक्ल हर्षाचा;

विषमातील सहजता, सा-रे-ग-मचा सुवास,
दरवळे देहाच्याही जड बोजड हाडामासात;

पहा, धावत ओलांडे ऐरावत सप्तवर्णी पूल
सोनेरत्नांचा अवचित सुगंधी हंडा जिंकण्यास.

१६ एप्रिल २०२५

# २०: जांभळीच्या खाली

जांभळीच्या खाली बसला होता हत्ती
सांगे मौज अधिकतेच्या रहस्याची;

छोट्या घटात आकाश होई मोठे मोठे,
आणि म्हणे, अपूर्व महानता आहे इथेही;

जांभळीचा प्रभाव असा की, मी देखील
करीन धारण रूपे रूपे, चैतन्याप्रमाणे;

करे काय रिपू? मरन? करे काय काळ?
मी असे मुक्त, मोकळा सर्व बंधनातून;

झालो मी जसा व्हावयास पाहीजे तसा,
ह्याच कारणे घेतला जन्म या ठिकाणी.

१६ एप्रिल २०२५

## २१: चेटकिणीचे भवितव्य

बसलेला ह्या फांदीवर सुंदर एक पक्षी,
लखलखीत, पट्टा लालसर गळ्याखाली;

आत्मविश्वास असे त्याचा इथे येण्यात,
महत्प्रेरणेने स्फुरित दिव्यत्व साधण्या;

सांगे एक मौज, काय विचित्र घडले पूर्वी,
भेटली होती रात्री काळी विद्रुप चेटकीण;

म्हणे, लक्षात घे, हा अधिक मास संपता,
मृत्यु तुझा अटळ, आलास जरी तू तेथून;

निर्णय माझा नव्हे, काळाचीच ती यंत्रणा,
नसे सुटका दैवगतीतून भल्याभल्यांचीही;

पण होतो मी निर्धास्त, आंतरिक निश्चितेत,
घेत खात्रीचे हिंदोळे चाफ्याच्या डहाळीवर;

अग्निकुंडातुनी आला होता अमर वृक्ष,
शुभत्वातला, स्पर्श न होता कशाचाही;

अस्मानी तेज माझे, ते न छेदती शस्त्रे,
न जाळे पावक, हो, देह तर प्रज्वलीत;

नसे तिच्याजवळ प्रतिभा, संज्ञा संपदा,
त्रिकालदृष्टीच्या पलीकडचे पाहण्याची;

मग कसा ठरे शब्द तिचा खरा, अज्ञानी ती?
मी मुक्तच नव्हे, चैतन्यात आहे क्रियाशील;

लहान कक्षेत न बांधलेला, श्रेष्ठ मी, महान,
दिव्यत्वाचा परम अंश दिव्यत्व वाढविण्यास;

एके दिवशी काळी चेटकीणही होईल सोनेरी,
सोन्याची फुले वेचण्या सोनचाफ्याखाली.

२३ एप्रिल २०२५

# २२ः वसंताच्या जल्लोशात

हा वसंतऋतू असे सर्व ऋतूत,
खरेच स्नेहल आनंदाची वृष्टी;

अचानक चुंबुनी पृथ्वीच्या भाळी
सौंदर्याहुनी सुंदर करी तिचे सौंदर्य;

वसंतात वर्षा लावी प्रेमाची लागवड,
जसा शिशिर आणे दवबिंदूंचा हर्ष;

कोकीळ गाये मोहोराचा गोडवा,
करे रम्य उत्सव उल्हसित निसर्ग;

उजळे थोर कल्पकतेचे वैभव,
नदीच्या नादात सागर संगीत;

ऋतुसंहार तर वसंतात सूर्याचा,
न संपणारा  रंगरंगीत  प्रवास;

बारा राशीतूनी फिरे कालचक्र
विजयी वसंताच्या जल्लोशात;

बहरला बागबगीचा सौभगाचा,
स्तुती गाजे सर्वत्र वसंत म्हणून.

२७ एप्रिल २०२५

## २३: आणे संदेश पक्षी माझा

आणे संदेश पक्षी माझा, फाटले आभाळ,
कोसळती हिरे माणिकांच्या सरीच्या सरी;

ह्या सृष्टीच्या संसारात बरसात प्रेमाची,
की  क्षणाक्षणांमधेही उजळे शाश्वत;

हत्ती घोडे धावती गोळा करण्याकरिता
अद्भुत वैभव, न्यारी विपुलता प्राणा-देहात;

बदले येत्या युगात प्राचीन प्रकृतिधर्म,
महाभूते अंग अंग होतील परा सामर्थ्याचे;

घडली होती जाज्वल्य धारणा योगियाची,
जडत्वात आत्मचैतन्याची कार्यशीलता.

२६ एप्रिल २०२५

## २४: चैतन्याची तेजोमय उद्दिष्टे

देहप्रकृतीत आहे बसलेला प्राचीन मृत्यु,
पण ही तर नीव्वळ जुनी एक आखणी;

मी मरत आलेलो आहे अनेकदा, जन्मोजन्मी,
म्हणूनीच का मी मरणार आताही पुन्हा?

पूजेचे फूल संध्याकाळी होईल निर्माल्य,
साधले का त्याने त्याचे पुरे मौलिकत्व?

दैवदुर्विलास ह्या संसाराचा चमत्कारिक
देहान्तात पेरलेली आहेत बीजे उद्याची;

काया नसे इथे केवळ होण्याकरिता भस्म,
हाच मृत्यु घडवे सौभाग्यशाली रूपे रूपे;

पण आता आहे ती अज्ञानात जखडलेली,
नसाव्या त्या आणखी दुःखमय शृंखला;

निश्चितच ठरे निष्क्रिय कालचे क्रियापद
मुक्त होईल तनु काळ्या जड अज्ञानातून;

एवढेच नव्हे, हिरण्यमय अग्नि घेई देह
साधण्या उद्दिष्टे तेजोमय चैतन्याचीच.

२ मे २०२५

# २५ः उमगले माझेपण माझे मलाच

बसलो होतो प्राचीन आम्रवृक्षाच्या छायेत,
आणि उमगले माझेपण, माझे मलाच;

पाहता पाहता तेथे आला शुभ्रवर्णी रेडा,
आणि जसा आला लागला वदु  वेदमंत्र;

सांगे, वदविले तें माझ्याकडून योगियाने,
उदात्त छंद, सुश्राव्य, महान, अर्थही गहन;

सर्वत्र, त्यांच्या लयीत फिरती विश्वाची चक्रे,
जसा अनाहत ध्वनी वेगात पसरे सगळीकडे;

पण बोले ऋषी दीर्घतमस चातुर्वाणीचें,
एकची असे इथे, त्या तिघी पलीकडे, गुहेत;

ओळखतो मी त्यांनाही पण उत्सुकता की,
अवतरेल का जगती इथे त्यांच्या छंदासह;

येई पश्यन्ति परावानीच्या प्रखर उजेडाने,
बघत बघत, घेत घेत, सर्जनशील आनंद;

कदाचित उमगेल तेव्हा  मला माझेपण,
खऱ्यात वाढण्यासाठीच तर आहे मी इथे.

७ मे २०२५

## २६: प्रशांतीची लयबद्ध रूपे

हजार शेराची घंटा वाजे संथ तालात,
उंच शिखरावर, दृष्टीच्या खूप पलीकडे;

होकारार्थी ध्वनी येई त्याच्याही पलीकडून,
विवेकी, मौल्याचा, संदेश दूरच्या भविष्याचा;

प्रतिसाद मिळे हर्षित दऱ्याखोऱ्यातून,
हसती तृणबिंदू, विस्मयीत होती वनपाखरे;

शोधता शोधता शोधले गोड तुहीनाचे रहस्य,
नीळ गगनी न हतमळलेल्या उदात्त आशांचे;

हृदयाच्या अथांग गुहेतून येती मंजुळ सूर
प्रशांतीने धारण केलेली लयबद्ध रूपे;

नाचे आनंदाचा मयूर हरभरी अंगणात,
सुरेख त्याचा पिसारा विश्वाचा पसारा की.

६ मे २०२५

# २७: सगळे काही जाणणारे स्मित

आले दुरून सगळे काही जाणणारे स्मित
नसे त्याला कारण, नसे एखादे ध्येयही;

त्याचे ज्वलंत रूप आहे केवळ आनंदाचे,
मधुर रसाने भरलेली जशी सोन्याची घागर;

ते आहे म्हणून तर आहे मी, माझे सर्वच,
गुरांचा गोठा, तेथे प्रेमळपणाचे हंबरणे;

रात्री दिवसा, सदाकाळी, भरभराटच सर्वत्र,
ओथंबून जाई शाश्वताने क्षण आणि क्षण;

असत्य खोटेपणा लबाडी पाप दुर्दैव, सारे,
नसे त्यांना थारा सृष्टीच्या व्यवहारात;

सौंदर्य आहे स्मिताच्या गूढत्वाचे कारण,
तेचि करीन मृत्यूलाही साजेशे, शोभिवंत.

११ मे २०२५

## २८ः अद्भुताचा उत्सव

अद्भुताचा उत्सव, अनिर्वचनियत्वाची गहनता,
चैतन्याचे धन, सत्याचे धन, आनंदाचे धन,
विराटाचे हिरण्यगर्भाचे प्रज्ञानघनाचे वैभव,
सप्तलोकाची क्षमता, सप्तभूमीचे गूढत्व,
सप्ताग्निची प्रज्वलता, सात आहुतींचे मूल्य,
सात अर्चनांची भावपूर्णता, अर्घ्यांचे प्राशण,
सात रंगांचे, स्वरांचे, सप्ततारकांची दृष्टी,
सप्तशृंगाचे उंचावणे, मार्कंडेयाचे मनन,
सप्तदेवाची तेजोमयता, सप्त मानवाचे कर्तृत्व,
उज्ज्वल प्रशांततेत मधुर वीणेचा सर्वंकष रस,
सप्त पाताळी देखिल आगळे वेगळे आश्चर्य,
जीवनात, मृत्यूत  वाढणारी मोठी समृद्धी, –
इच्छिलेले सर्व हा विधात्याचा महान संकल्प,
तो नेई पूर्तीस त्याचीच कार्यसिध्दीची प्रेरणा;
निश्चित, हाच तर सौंदर्याचा अद्भुत जल्लोष.

१३ मे २०२५

## २९: ह्या प्रेमभरणीत एकच ध्यास

आश्चर्य की! घडत आहे हे युगायुगांनंतर!
एक अतुलनीय पळ, अद्भुत अलौकिक क्षण,
हा असा, स्थिर, शांत, भरीव, निश्चल, उभा,
पाहत आहे गतिमान शाश्वतही अद्भुततेने;

भाग्यशाली काळाच्या अधिष्ठात्याने निवडलेला,
करण्यासाठी ती घटिका दिव्य देहाची योजना,
सहजतेने सुकृतीची घट्ट धरलेली भाग्य संधी;

एका आवेशी अविश्वसनीय महासागराने
ओतले आहे की स्वतःला महासागरातच,
हो, माधुर्यामधे पूर्ण समरस झालेले माधुर्य,
सुगंधी मधात सुगंधी मध, दिवसात दिवस;

एकरूप होऊन अथांग ते परिपूर्ण जीवन
करीत आहे प्रफुल्लित हिरव्यागर्द सृष्टीला;

जिवलगेचे देखणे रेखीव आंतरिक प्रलोभन
आणले आहे प्रेम-प्रीतीने निदर्शनास, बाहेरही,
न पाहत्या दृष्टीला दाखवून, केले आहे प्रसन्न;

आणि खुलवूनि सौंदर्याच्या आनंदी जादूने
केले तिने मोहित प्रियकराच्या नश्वर आत्म्याला;

आकाशभर थोरला गोडवा आणला प्रियतमेने,
दूर पुरातन देहव्यथा त्याच्या टाकल्या काढून;

कालातीत, कठोर, निष्ठुर, श्रेष्ठतेला आडवणारे,
आत्मा आणि जड पदार्थातील केले द्वैत नष्ट,
झाला लुप्त भौतिक-आत्मिकतेतील प्रतिकार;

करीत आहे नवनवीन महानता नृत्य उल्हसित,
मोहक लावण्य-आकर्षणांची हर्षीत परिणती;

पण होती एकमेव मोठी स्फूर्ती प्रेमभरणीत,
तो ध्यास, असण्याचा मात्र अग्नीदीप्त तनु,
मृत्युलोकीही दिव्य क्रियाशील पार्थिवता;

असेल असे वाद्य जशी काही अभिनव वीणा,
अनंताचे संगीत छेडणारी, दूरच्या अनंताची,
त्या आत्म्याच्या बहुविध तेजामधे प्रकटणारी;

असेल सोनेरी झळझळीत चैतन्यमय कुंड,
देहधन अग्नीचे, त्याची तनु, श्वास घेणारी;

उमलली आहेत बागेत सर्वत्र तजेली फुले,
उत्कंठित, आणि करीत आहेत गोळा भ्रमर
आल्हादिक मधू, आविष्कार मधुराईचाच;

स्वीकारुनी देहाचा चैतन्यशील पदभार,
उजळे पुष्कराज अग्नी जीवनाचे वैभव,
येईल घडवूनी मृत्यूहीन अमृतमय देह
प्रत्यक्षात पृथ्वीवर होईल ज्ञानपुरुष तो.

१४ मे २०२५

# ३०: हायकू प्रकार

**हल्ला**
सात वाजता गेली गुरे चरायला,
पण असेल का देव रानावनात?
— तेथे झुडपात आहे लपलेला क्रूर.

**न लागे ...**
ह्या धनुष्याला न लागे बाण
ह्या अर्थाला न लागे शब्द,
— भावनांना नसे गरज हृदयाची.

**नाहीत पुस्तकालयात ग्रंथ**
झोप, पण नव्हते पाहीले स्वप्न,
मोठे भव्य पुस्तकालय, भरलेले,
— पण नव्हता तेथे एकही ग्रंथ.

**योजना नसे ती कुठे?**
सुख आहे दुःखातही, नसे ते कुठे?
खरच, अंधारातूनही पसरे प्रकाश,
— मृत्युमुळेच वाढते जीवन.

**पावित्र्य**
आलेली ही सकाळ नाही कधीच जाणार,
परवाचे फूल मोगऱ्याचे, बघा आज ही ताजे,
— त्याचे शुभ्र सुगंधी पावित्र्य कारणची.

**सांगशिल का?**

सांगशिल का हेतू काय मोठा आहे तिथे,
असावे गाण्याहून माधुर्य प्रेमाचे जास्त गोड,
— निळेपण उंच उंच आकाशाहीपेक्षा?

**एक कठीण जिज्ञासा**

थांग न लागणाऱ्या अजब पोकळीत
खोल उतरे उत्कृष्ट सूर्य, कुतूहलच की,
— असू शकेल का शून्यतेत रहस्य काही?

**निवडुंगाची फुले**

वाळवंटी, ही निवडुंगाची फुले तिथे,
आणि त्यांना उमगलेले आहे गुपित,
— अनोखा आनंद, तो हर्ष रेताळातही.

**सतत पडत राहिला पाऊस**

चंद्रकोरीने शिंगावर धरला डोंगर,
कौतुकचकी, नवल, अद्भुततेचे कृत्य,
— आणि सतत पडत राहिला पाऊस.

**वेगवान प्रगती**

वेळ आणि कारणस्थिती
होतात गायब निर्वाणाच्या देहात,
— आणि येई गती कांस्य चक्राला.

**देशपांड्यांचा वाडा**

वाड्याच्या पुढच्या अंगणात आंब्याचे झाड,
डेरेदार, पूर्वजांनी लावलेले, प्रेमळ, घराण्याचे,
— येतो इथे मोहक भरदार मोहोर कल्पनांचा.

**आरोहण**

कीर्तिशाली चढण, उंच उंच चढणारी,
हिमालयाहूनही उंच, विश्वामित्राची तपश्चर्या,
— गायत्रीचा घोष, अवतरे सविताच.

**ध्वनी विचारे**
दुरून येत आहे ध्वनी छोट्याशा धबधब्याचा,
जायी तो न दिसणाऱ्या सागराकडे,
— विचारे, धबधब्याला परतेल का मी?

**पोहोचे संगीत धामा शांततेच्या**
इच्छिले त्याने संगीत, आणि जन्मले सा-रे-ग-म,
पण बघा की, हे न अडखळणारे सूर,
— अष्टकाचा ध्यास पोहोचण्या धामा शांततेच्या.

**ढग नाहीत पण ...**
ढग नाहीत पण पडत आहे पाऊस,
वीणा नाही पण आहे मधुर तुणतुण,
— आहे निराकाराच्या रूपात सौंदर्य.

**२३ः आहे का खात्री?**
ह्या नभाची नसे पक्षाला खात्री,
वाहत्या पाण्याची मासोळीस,
— काव्याला भरवशाच्या स्फूर्तीची.

**वाट पाहे पृथ्वी**
आकाश आहे म्हणूनच हा निळा रंग,
वायू-अग्नि-जल देई रूप अमूर्ततेला,
— वाट पाहे पृथ्वी सत्यदेहाच्या कृतीची.

**इथे लटकलेले शेपूट**
काय सांगावी महानता त्याची, तो चतुष्पाद,
न दिसती तीन ह्या अलीकडच्या दृष्टीला,
— शेपूट मात्र आहे त्याचे लोंबकळत खाली.

**कोकिळेचे दुःख**
कोकिळेचे दुःख आणि ते वसंतात?
प्रियकराच्या वियोगात हरवले गाणे;
— पण येई तरी परिहाराची कुहू कुहू.

**आडवे उभे धागे**
बाभळीच्या झाडावर सुगरणीचे घरटे,
धावती धागे आडवे उभे, कौशल्याचे;
— जीवनाचे भविष्य वीणे काळ तसेच.

**प्रभावी हाक**
शाश्वत आहे पाहत वाट क्षणाच्या येण्याची,
होता तो दडलेला गहन अंधारी विवरात,
— पण गेली प्रभावी हाक न जुमानता काहीही.

**छायेचे पर्यटन**
केली तयार त्यांनी छायेची होडी,
घनदाट अंधारात बसुनी, रात्रभर,
— छायाच करे तिच्यात लांबचे पर्यटन.

**कशाचाही न होई नाश**
कधीच करता येत नाही नाश कशाचाही,
असो अंतराळातील नक्षत्रांचे असंख्य समूह,
— गहन रिक्तता, महाशून्य शक्तिशाली.

**निर्देशांचा जन्म**
असेल का पूर्व दिशा नसताना सूर्य,
मोठा प्रेमपूर जेंव्हा नसे निःशेष प्रेम?
— त्यांच्या करता तर जन्म निर्देशांचा.

**दिव्याविना रात्री उजेड**
बी नव्हते लावलेले पण उगवले रोप,
दिव्याविना रात्री उजेड सगळीकडे;
— अज्ञानात आहे भरलेले भरगच्च ज्ञान.

**हे न्यारेच आध्यात्म**
आहे हे आध्यात्म न्यारेच,
तनु अग्नीची हृदय आनंदाचे,
— मृत्यूविना शोध चिरकालाचा.

**वाट पाहतो हलकडीची**

भेटला मला एकदा उंचटसा कवि,
सदऱ्याच्या खिशात कागद-पेन्सिल,
— सांगे, वाट पाहतो कवितेच्या हलकडीची.

**नक्षीदार झोपाळा**

आजोबाच्या घरी महोगनीचा मोठा झोपाळा,
छान कोरीव काम सांगे पिढ्यांच्या आठवणी,
— त्यांच्या आजोबांच्या, छायेखाली फुलणाऱ्या.

**हेमलॉकचा कप**

सुज्ञ-वृद्ध हूपुला प्यावे लागले प्यालाभर वीख,
गुन्हा, म्हणे, शिकवीत होता पाखंडी तत्वज्ञान,
— मोठ्या तळ्याच्या काठी, बिघडवीत नवपिढीला.

**भाकीत**

फांदीवर अचानक एक पक्षी पूर्वेकडच्या बागेत,
आणि गात गात रंगीत सुगंधी वाऱ्याची झुळूक;
— सांगे, घडेल अद्भुत, सकाळी उद्या, वाजता आठ.

**सात अग्नी**

मी तुला सात अग्नी म्हणून संबोधतो, महान,
खरोखरच, तुझ्यामुळे आहेत सूर्य तेजस्वी;
— पार्थिव देहात, पृथ्वीवरही, असू दे त्यांचे तेज.

**अद्भुत वचन**

मृत्यूच्या सौभाग्य रूपात आहे सृष्टीचे सारे रहस्य
आणि दिसेल ते सात अग्नीच्या ज्वालातून;
— अद्भुत वचन हे, विजयाची सुवर्ण निश्चितता.

१६-२२ मे २०२५

# ३१ः गरुडाची दृष्टी

स्वतःलाच पाहण्या सृष्टीची दृष्टी,
चमत्कार असे तिच्या थेटपणात;

तृण फुले पक्षी प्राणी तारामंडळे,
विहंगम गीत खाली वर चोहीकडे;

धबधब्याचा धबधब ध्वनी दुरुनी,
कल्लोळ स्वानंदाचा आकाशाभर;

गरुडाची दृष्टी व्यापणारी सारे विश्व,
पाही इथे होणारी अचानक किमया;

नसे दुःख, नसे वेदना, नसे काळेपण,
खोल शिरता दिसे लक्ख प्रकाशच;

झोप ती साफल्याची बाळगे यश,
स्वप्नांकीत नव्या आशा वास्तवतेच्या;

डौलदार वाढे ह्या अंगणातला वृक्ष
अर्पण्या त्याची अर्चना गगनाला;

उजाडत आहे परिपूर्णतेचा दिवस,
जे ठरविले होते पूर्वी घडे ते आता.

८ जून २०२५

# ३२ः गुणाकार मांडीला आणण्या सर्वांगी बहुत्व

गेले शाश्वताचे बहिरेपण, "मीच"चा हट्ट,
गतिमान असे ध्वनी, खणखणीत बोलणे;

ऐकू येई सोनेरी चाहूल तत्पर भविष्याची,
धावे धावे आकाशातील नवगंगा दक्षिणेकडे;

प्रज्वलित झाला वर्षानुवर्षांचा सोत्कंठ देह,
सप्तज्वालांनी वाढविलेले थोर पुण्यधन;

जागृत कुंडलीची फुंकार साती ठिकाणी,
खालीवरही, प्रकाशित झालेल्या पार्थिवेत;

लहान मोठ्या क्षणात आहे सिद्धीसामर्थ्य
देण्या चालना स्तंभित नियतीच्या प्रेरणेला;

झळाळी, नाही सावली क्षुद्र मनोविकृतीची,
प्रगल्फतेची झगझगीत उत्कृष्ट ज्योत ती;

पहा, आवेग ग्रंथच्या मोठे ग्रंथ लिहिण्याचा,
एकाच निर्मळ झऱ्यातून नवलाईचे प्रवाह;

संपले जवळचे-दूरचे, सारी नाते, एकत्वात,
तरी राखुनी आदरणीय वैयक्तीकता स्वची;

बदलून निष्क्रियता जाणते प्रकटीकरण
हाची महान संकल्प घडवी नूतन सृष्टी;

गुणाकार मांडीला आणण्या सर्वांगी बहुत्व,
कानाने श्रवण त्याचेच आता खोल ठायी.

६ जून २०२५

# ३३ः अंधाराच्या गुहेत दिवा

अंधाराच्या गुहेत तेवतो सतत दिवा,
दाखविण्या शुभ दृष्टांताची उत्कंठा;

की चमत्कारीक किमया चैतन्याची
अनावस्थेतही लपलेले सत्याचे गूढ;

शून्य घडविले येण्या अजोड सृष्टी
वाढत जाई अनाकलनीय चित्तात;

इथे तिथे पाहता दिसे दृष्टीस रूप,
घेतलेले रहस्यमय निराकारानेच;

सकाळी चार वाजता पडली बाहेर
ती धडाडीची आकांक्षा उल्हासात,

आटोपूनी नित्याचे आन्हिक विधी
अनुभवन्यास झाली प्रेरणा पावन;

अचानक सापडावा दुर्मिळ मोती,
गढूळ पाण्यात, झिडकारुनी बंधने;

चढणीत आहे आवेश भविष्याचा,
कीर्ती जिंके उंच प्रभावी डोंगर तो;

निशाचरही झाले दिव्यत्वाचे अंश
वाढविण्या अमोल जीवन पृथ्वीवर;

अंधाराची खोली शोधता शोधता
येई प्रचिती तळपणाऱ्या सूर्याची.

२३ जून २०२५

## ३४: अतिवास्तवता

कोसांचा प्रवास पण पाय धरतीचे जडच,
न दिसे काव्यसृष्टी, ती उभटशा अंगाची;

चंद्र, तो तर गेला कोरड्या नदीत वाहून,
धो धो लगेच आला भला मोठ्ठा पाऊस;

घसरली उत्तरेकडची हडबडी कल्पना,
जरी हातातील कडे दिले होते विष्णूने;

उत्स्फूर्त शंखाची गर्जना, फाटे आकाशही,
निःशब्दतेने अर्थच अर्थ केले खूप गोळा;

खट्याळ घड्याळाने मांडला क्रूर हाहाकार
तिन्ही चाके फिरू लागली काळाची मागे;

आरशात दिसे वास्तविकता चमत्कारीक,
कारण होते कालच्या काळोख्या रात्रीचे;

ह्यात सख्यासोयरांचे उगीचच येणे जाणे,
नको होती भुरळी आलिंगने, त्या भेटीही;

फटकावलेला हसरा चेंडू झाला दिसेना,
गवसले असेल का ते त्याला, अर्चीलेले?

मघाशी सांगितलेली गोष्ट सांगतो पुनः
हिरवट मोत्यांचा हार झळकेल छातीवर;

गेली पळून मागच्या दाराने हिमट भीती,
मंदिरात टाकला सुटकेचा सुस्कारा देवाने;

आज तर आहे टिटवाळ्याची महा यात्रा,
आले अनेकवचनीय उद्गार घेण्या रेवड्या.

३० जून २०२५

# ३५: गजबजलेले माझे लहानसे गाव

नदीच्या काठावर मूर्ती मारुतीची
श्रद्धाळू गर्दी संध्याकाळी पारावर
वाऱ्याची झुळूक येई डोंगरावरुनी
छोटे दिवे उजाळे भाविक अपेक्षा
पलीकडे दाट हिरवीगार शेतीवाडी
गुराढोरांची प्रेमळ ख्यालीखुशाली
मळ्यात धान्याचे सुंदरसे कोठार
नन्हीशी शाळा हसतमुख शिक्षक
नसे वह्या पुस्तकांचे गट्ठे, दप्तरे,
धृड संस्कार घडवी प्रेरुणी आवड,
सांगे मोल महत्व उगवत्या सूर्याचे
पाची अंगांचे उज्वल रूप होण्यास,
बुधवारच्या बाजारात भाजीपाला
गूळ खोबरे फरसाण ताजी मिठाई,
येतात शेजारच्या गावाहुनि घेण्यास
चवली पावलीच्या वस्तू पिशवीभर,
संक्रांतीला बैलगाडयांची शर्यत
नृत्य नाटक असती अधून मधून
बळ बाहुत शत्रूलाही हरविण्याचे,
अहो जीवनात अजून काय पाहिजे?

१ जुलै २०२५

## ३६: जांभळे स्वप्न वाऱ्याच्या झोतात

धावत आहे जांभळे स्वप्न वाऱ्याच्या झोतात
समयाच्या प्रसन्न स्मिताने आणलेला हर्ष;

दूरवरच्या अनंत शांततेतून आलेला हा शब्द!
धारण केलेला गूढ अर्थच की, अढळ अंतर्ज्ञान;

प्रेरित अजब विचारांच्या वेगवान चमत्कारात
पोहतात कल्पना अद्भुत आशयाच्या बोधाने!

प्लॅटिनम तारांच्या उत्साही स्वरांमधून आलेले
शांत सर्जनशील संगीत वाढवी सुसंगता;

न उडलेल्या उड्डाणांमधून केले पंख गोळा,
आणि आले लगेच दुसऱ्या आकाशातील पक्षी;

रूप जाई ठरविले चेतनेच्या निकडीप्रमाणे,
उत्कृष्ट प्रकाशाने झगमगणाऱ्या द्रव्याचे;

बहरली डौलदार बाग आता फळाफुलांनी,
आनंदात वाढणाऱ्या आनंदाच्या उत्सवात;

मातीच्या आकांक्षेत पहाटेच्या वेळी आशा,
भविष्यातील संकल्पिलेले हिरवाईचे वैभव.

५ जुलै २०२५

## ३७: रुसूनी बसली कवीता

काय झाले असावे ह्या कवितेस
रुसूनी बसली ती माजघरात?

कोमजलेला नव्हता तरी मोगरा,
नव्हते ही हरवले कल्पनेचे धन;

उत्सुकतेची वीणा उभी समोर
वाट पाहत आंतरीच्या सुरांची;

पडतील का दवबिंदू गगनातून
निळे हास्य कोवळ्या प्रतिभेचे?

तरीही न उमटे शब्द स्फूर्तीचा,
न गवसे कारण ह्या अभावाचे;

उंच पण मारली भरारी आशेने
कठोर वारे जरी तिरपे आडवे;

आणि बघा उजळली ही ज्योत,
प्रज्वलित, अचानक, उल्हासाची;

केली वेणीफणी हसली कविता,
हो, सौंदर्याचा सुगंध सगळीकडे.

३१ जुलै २०२५

## ३८ः सतत वाहणारा झरा

पहिल्या दिवसापासून वाहतो झरा,
सतत, कधीपण न आटणारा हर्ष;

हौशी थवेच्या थवे मोठ्या अस्मानात
मुक्त विहंगन कल्पनेच्या दाही दिशा;

धावे आनंद अरुंद गल्लीबोळात,
वेगाने, राजमार्गावरही, रात्रंदिनी;

राईंचा, भरभराटी पेठ्यांचा गलबला,
भल्या बरणीभर आविष्काराचा मध;

स्वप्न नसे हे, प्रगल्भतेचेच जीवन,
प्रखरत्व त्याचे तापल्या सोन्याचे;

येती रहस्याचे भोक्ते इथूनतिथून
निर्मात्याच्या घरून ह्या सृष्टिस्थळी.

२ ऑगस्ट २०२५

## ३९: टक भिडे टकेला

मिळविले सुरेख पंख सुरंगीत स्वप्नाने,
हर्षाची ही झेप दाट हिरव्या डहाळीवर;

शब्दार्थांची उडी सर्जनशील शांततेत
हृदयाचे स्पंदन आश्चर्याच्या वेगाने;

वाजे भलामोठा गॉंग डोंगरमाथ्यावर
आणि झाला वैभवी सौंदर्याचा जन्म;

मंत्रप्रेरणेने होई गूढ अगाध शोध सुरु,
दैवयोगाचा, नियतीच्याही पलीकडचा;

विधिलिखित, आत्म्याचा थोर कुलीन
येई रोजच्यापेक्षाही निराळ्याच वाटेने;

अंतर्ज्ञानी क्षणाच्या स्मिताचे ते सामर्थ्य
पुष्कराज धावे पुष्कराजाच्या जीवनात;

दृष्टीने पकडली दृष्टी, अग्नीचे आलिंगन,
जिंकले मृत्यूचे सगळे प्रबळ प्रांत प्रेमानेच.

७ ऑगस्ट २०२५

## ४०: गा, आणि देतील टेकड्या उत्तर

गा, आणि देतील टेकड्या उत्तर,
गडगडाट उल्हासी आभाळात;

छंद नाचे घेऊनि मयूरपंख,
कल्पनांची बरसात अंतर्मनी;

जे पाहिले नव्हते कधी दृष्टीने
अचानक दिसे श्रेष्ठता इथली;

कालगतीत धावे ऊनपाऊस
तरी देखील दौड आनंदाचीच;

हो, येई हाक अगम्य देशातून,
सातही लोक देती साद उन्नत;

गा, वज्रकाय देह होई तेजोमय,
घडण्याशी हे, गा, सकळवेळी.

६ ऑगस्ट २०२५

# ४१: माझी सावली

टक लाऊन पाहत आहे मी माझ्या सावलीकडे,
तल्लख आहे ती, जादूचा पोशाख लेऊन आलेली;

भल्या प्रकाशात, पायाजवळच, मी आहे म्हणून,
साथ देई पदोपदी, खरी दिशा कुठेही न चुकता;

साधले ह्रस्वदीर्घ, धावणाऱ्या काव्या-लालित्यात,
भूषवी अस्तित्वाची गूढगहणता, खोल अर्थाची;

उत्सुकतेने जसा जसा उतरे मी तिच्या आंतरात,
दिव्यत्वाची अद्भुतताच वाट पाहे प्रकटण्याची;

सोबतीन म्हणे, मलाही द्या समृद्धीचे वरदान,
करीन परिपूर्ण जीवन मृत्यूहीन जीवनात;

जशी शोधे चांदणी परवलीचा शब्द चांदरातीत
सापडे तिला अग्नीतत्व स्थापिलेले पुरातनकाळी.

१० ऑगस्ट २०२५

# ४२ः जा, पावसा जा

जा, पावसा जा, मार डुबकी समुद्रात,
सापडेल तुला तेथे रूपवंत मासा;

जन्मले नव्हते काहीही तेंव्हाची गोष्ट,
आली एकदा स्फूर्ती उभवण्या संसार;

संकल्पीला बहुविध मोलाचा प्रकल्प,
केली भूमी तयार त्या सूर्यप्रकाशात;

अवतरे महाअग्नि जडत्वाच्या घरी,
वाढविण्या दिव्यत्वाची ठिणगी पहिली;

विष्णुचे घेतलेले रूप प्राचीनकाळी,
प्रळयात रक्षिल्या उज्चल स्तुतीगाथा;

गाता गाता झाल्या अजून प्रासादिक,
प्रभावी, युगायुगांचे धन मृत्यूक्षेत्री;

येईल ऐकू सनईत शांतमल्हार,
विजयाचे ढोल मृदूंग विश्वभरात;

मानव उद्याचा इथे, प्रदीप्त राशीत,
योगेच्छेचे सामर्थ्य त्याच्यात ओतलेले;

ये रे, ये रे, पावसा, घे हे सोन्याचे नाणे,
बरसू दे आनंदी वर्षा, बरसू दे अंतरदेही.

१२ ऑगस्ट २०२५

# ४३: माझे दोन डोळे

माझा उजवा डोळा पाहतो उंच आकाशाकडे,
धुंडूशोधीत त्याचे न दिसणारे गूढ निळेपण;

असेल त्याच्याही पलीकडे खूप वास्तव्य प्रज्ञेचे
तरीही न जाई दृष्टी जसे शून्य ते, अगाधच;

म्हणे, हो, तेथून झाला प्रारंभ ह्या घडामोडींना,
वाहू लागली न थांबणारी ध्येयनिष्ठ सरिता;

हिरवीगार शेतीवाडी पशुपक्षी, कल्पक योजकही,
घेतील भरारी भविष्याची, गाठण्या सर्वोच्चता;

दुसरा मारे खोल उडी निसर्गाच्या अंधाऱ्या रात्रीत,
कालगतीत दिसे तिथे अनादीकाळाची क्षमता;

चमत्कार असा की नाहींतून उपजे ईश्वरत्व,
जसे काही ऐकू येई शंखनिनाद शंखाविना;

प्रदीप्त आहे हिरा दाखविण्या मूल्य काळोखाचे,
कण तेजस्वितेचा वाढे वाढे त्याच्या रहस्यात;

गम्य आंतरात पाहिले अवलोकनाऱ्या दृष्टीने,
आणि आली जन्मास आश्चर्याची परिपूर्णता;

नजर भेटे नजरेस शोधता अज्ञानाचे ज्ञान,
मिळती प्रतिसमांतर रेषा अलौकिक बिंदूत.

१६ ऑगस्ट २०२५

# ४४: नदीच्या किनाऱ्यावर

दिसे मला खरे स्वप्न नदीच्या किनाऱ्यावर,
वाहत येई ते पूर्वेकडून सकाळी सकाळी;

हातात होते उमललेले फूल गुलाबाचे,
स्मित जसे काही फुलली भावना ह्रदयाची;

येती पंख लेऊनी निरनिराळ्या रंगछटा,
पाचू, लाल मानिकासारख्या, गढद जांभळ्या;

स्फूर्त कल्पना घेई निर्बंध उड्डाण चोहीकडे
खालीवर आतबाहेर आनंदाच्या परिसरात;

भरकन नवलाईचे सूर होतील लुप्त निद्रेत,
जड निद्रा नव्हे, उत्कृष्ट सुषुप्तीची जागृता;

पाहता विराट स्वरूप बोलू लागे दगडधोंडा,
कौशल्य कर्त्याचे, फुटेही प्रभावी वाचा तेथे;

शिरले स्वप्न हिरण्यगर्भात स्थापन्या नवी सृष्टी,
ज्वलंत ठेऊन महा अग्नी प्रज्ञेच्या तेजस्वितेत;

जे आहे अवर्णनीय येई ऐकू त्याचा अर्थध्वनी,
पश्चिमेच्या सागराकडे नितांत आत्मप्रशांततेत.

१७ ऑगस्ट २०२५

## ४५: अद्भुत दमडीची कहाणी

मागितले एकदा मानसपुत्राने बक्षीस,
दिली गोंडस दमडी हातात होती ती;

नाचत नाचत गेली गावाच्या बाजारात,
घेतले विकत रंगरंगीत बत्तासे शेरभर;

ठेवला सकाळी एक देव्हाऱ्यात पूजा करून,
बाकीचे वाटले बालशाळेत मुलामुलींना;

हर्षाचा चेंडू गेला उंच उंच निळ्या आभाळात
आणण्या तेथील समृद्धीचे धन दमडीकरिता;

पडला कपिलेच्या दुधात वाडगाभर मध,
व झाले पूर्ण अर्थाने मधुर सगळेची विश्व;

तेव्हड्यात आणला वाऱ्याने केवड्याचा सुगंध,
आणि थरारला आनंद उत्फुल्ल जीवनात;

भक्तिभाव असा ह्या उल्लेखनीय दमडीचा,
मिळाला प्रसाद चांदीच्या भल्या मोठ्या ताटात;

तिने केले अपेक्षेचे आत्महृदय आशावादी,
आणि प्रखर अग्नी झाला अजून प्रज्वलित.

१८ ऑगस्ट २०२५

# ४६ः पुलकित धरणी

सरले दुःख, वेदना, सरला काळाचा कठोरपणा,
झाली पुलकित धरणी प्रेमळ हर्षाच्या स्पर्शाने;

पानांची टवटवी, पहाटे गोडपणा दवबिंदूंचा,
उमलल्या कळ्या बागेत, प्रसन्नतेच्या आशा;

रंगीत सुगंध पसरे सोनचाफ्याचा साती लोकी,
धावत उतरे अद्भुतता दिलेल्या आश्वासनाची;

आविष्कार अग्नीचा, मृत्यूहीन मरणाधीनत्वात,
घेई देहरूप चैतन्याच्या अनिर्बंध संकल्पेनुसार;

आले सूर्यधन दगडामातीच्या लहानशा घरात,
विधात्याची योगतपश्चर्या झाली इथे फलदायी.

२१ ऑगस्ट २०२५

## ४७: तृप्ती सुभग जिवनाची

माझ्या लहानशा बागेतली फुले
आणिती आनंद गोड मातीतूनी;

कौतुकाने पाहे उत्सुक आभाळ,
होकार देई पुरस्कृतीचा वारा;

झुळझुळू वाहे कल्पनांचा ओढा,
हिरवीगार प्रसन्नता उद्याची;

चढत चढत जाती सूर उंच
सौष्ठव प्रशांततेचे आणण्या;

पहा, भविष्य आत्मसमृद्धीचे,
येत आहे तेजोवेगाने इकडे;

प्रभावी कालमाहिमा अचानक
वाढवी तृप्ती सुभग जीवनाची;

पुण्यकृत झाला देह योगयज्ञी,
पाहिजे तशी घेई रूपे शाश्वत;

दैवाने नव्हे देवाने घडविले
साधण्या दिलेला शब्द पूर्वी.

२३ ऑगस्ट २०२५

# ४८ः जसे जाती शब्द खोल खोल

जसे जाती शब्द खोल खोल
उमगे बोधनीयता त्यांची;

अर्थ ध्वनी येतिल दुरूनी,
सांगत गौप्य लयास्वरांचे;

न लागे वृंदवाद्य, नौबत,
येतील ते नादाकडूनच;

भरारी म्हणून तर पंख,
प्रकाशामुळे आलेत दिवे;

सौंदर्यची कारण रूपांचे,
निर्गुणतेत अनंतगुण;

झाली एकदा प्रबळ इच्छा,
उभारण्या सृष्टीचे वैभव;

आविष्कारात नव्हते कधी
अवतरले कालगतीत;

प्रवास म्हणून तर पाय,
क्षुधेमुळे आहे पाकशाला;

घड्याळाच्या टिकटिकेतून
मोठेपण सांगे कालातीत;

अमराची मरणाधीनता
निश्चितच दिव्य जीवनार्थ.

२६ ऑगस्ट २०२५

## ४९: मृत्युप्रसंग

पांढुरकी सकाळ येताच
धावू लागली रथाची चाके;

पडले मागे ते राजवाडे,
विख्यात नगरे, तीर्थक्षेत्रे;

होई पुजाविधी स्वस्तिपाठ,
साठवित दशलक्षी पुण्य;

परी गवसेना वांछित जे
बाळगले जन्माजन्मांतरी;

सापडेल का ते आता कुठे,
प्रेम, दूरच्या तपोवनात?

वाट पाहत आहे भविष्य,
गाठन्या मृत्यू त्याच्याच घरी;

शाप नव्हे हा, शुभाशीर्वाद,
आणण्यास सुवर्णी दिवस;

असे ही घोडदौड अद्भुत,
प्रकाशाची प्रकाशाकडेच;

वाढविण्या पृथ्वीधर्म तर
होता प्राचीनतम संकल्प.

२८ ऑगस्ट २०२५

## ५०: पेटलेल्या ज्वाला

शब्द होते चपळ आणि प्रभावी,
घेत उड्या उंच पेटलेल्या ज्वाला;
सांगतात, जीवनाचे ध्येय असते
निस्तेज न होणाऱ्या आकांक्षेत.

पश्चिमेकडून आला अचानक पाऊस,
भल्या समृद्ध शेतात प्रसन्नतेचे पीक;
उत्साही आवेशात मध शिंपडलेल्या
सूर्यप्रकाशीत भविष्याच्या धान्यराशी.

जॉयने चमकदार घातली होती जीन्स,
चेहऱ्यावर अतिदुर्मिळ लैव्हेंडर क्रीम;
त्याच्या लूकचा अर्थ सौंदर्यच होता,
आत्म्यातून येणारा वेगवान प्रवाहच;

मेघगर्जनेला अपुर्वाईचे पंख, उडते ती,
आकाशातील शांतता जिंकण्यासाठी.

३० ऑगस्ट २०२५

# ५१: एक वैश्विक साक्षात्कार

नक्कीच, ठरविता आले पाहिजे मला
पडण्या हवेसे स्वप्न, ध्यासाचे, रात्री;

नाही का, सरळच ही विचारकल्पना?
तसे नसेल तर असावी सखोल झोप.

धावपळ सारी लांबच्या प्रवासाची
क्षणोक्षणी बाळगूनी प्रेरणा थोर;

घडला चमत्कार बघता बघता,
जसे असावा लख्ख प्रकाश विवरी;

आला एक तारा दूरच्या गावाहुनि,
म्हणाला, माझ्यात अंश सूर्याचा;

त्याच्याच तेजाने आहे मी तेजोमय,
अंधार जरी असे फार अवतीभवती;

काळाच्या काळ्याकुट्ट सावलीने
केलेला देह घडविण्या सुवर्णीय;

मांडला होता प्रस्ताव खूप पूर्वी,
धरणी ही केंद्रबिंदू वर्धण्या विश्व;

अलौकिक योगियाची योगधारणा
प्रज्वलित करण्याकरिता हा जन्म;

संयोग मागे भूतकाळात झालेला,
दिव्य जीवन भूतलावर, निश्चित;

तेजोमंडळात शिरे अंश भानूचा
प्रसन्नतेची अग्निमय विविधता;

हो, विश्वाच्या परिपूर्तीसाठी प्रपंच,
आखिला श्रेष्ठतेत भाग्यविधात्याने.

१ सप्टेंबर २०२५

# ५२ः धन्यत्वाची महान प्रचिती

समर्पिलें देवाला सर्व, दैवाधीन न होता,
क्रियाशील आत्मा उभारे संसार समृद्धीचा;

नाही देव देवघरातच, घर नुसते सांभाळण्या,
वाढे त्याची कीर्ती अणुरेणूत, विश्वाविश्वात;

उद्धार नव्हे मुक्ती नव्हे, चैतन्याचा प्रभाव,
आशा अपेक्षा करीत तेजःपूंज ज्वालाप्रति;

अचंबा, फुटले बोल माती धोंड्यांनाही,
नाचत हासत बहरली बाग अंगणात;

धावे धावे सरिता सांगण्या हर्ष अर्णवाला,
म्हणत मी जायी परत उगमाकडे उद्याच्या;

शब्दात अर्थाची अलौकिक बहुविविधता,
दृष्टांतांचा विस्मयकारी आविष्कार सगळा;

आले पलीकडच्या नभातून थवेच्याथवे,
शेंदुरी नारिंगी चंदेरी सोनेरी आनंदाचे;

ऐकू येत आहेत स्तब्धतेचे सूर अंतरी,
तालांची चढउतार, संगीत सुमाधुर्याचे;

उधळीत गुलाल नाद जयजयकाराचा,
येई धन्यत्वाची महान प्रचिती क्षणोक्षणी.

५ सप्टेंबर २०२५

# ५३ः कोंडाणा

मावळा झाला अमर जिंकूनि इतिहासाचा गड,
क्षेपूनि सह्याद्रीवर यशवंती आत्मविश्वासाची;

खाली निर्घृण दरीत होता काळाकभीन्न अंधार,
साठलेला युगायुगांचा, होई तेथे सिंहगर्जना;

नेते एक दैवी शक्ती लढवय्याला विजयाकडे,
धीरोदात्त निर्भयी होता शरण त्या महानतेला;

कोंडाणा शौर्याची प्रतिष्ठा, वाढवी उंची पर्वताची,
विलक्षण असे की, होई आकाशदेखील अवाक;

शततारांकित गौरव खड्गांचा, हारतुऱ्यांची रास,
झेंडा फडके त्रिकाल दृष्टीच्याही खूप पलीकडे;

आला होता तो अतिगूढ क्षण अनंतकाळातूनि,
छेद करीत जड रात्रीच्या भयानक शांततेचा.

७ सप्टेंबर २०२५

(कोंडाणा, आता सिंहगड, घटना ४ फेब्रुवारी १६७०ची, एक प्रतीक)

## ५४: शक्यतेच्या घरात

शक्यतेच्या घरात राहतो मी,
बहारदार ते काव्यापेक्षाही;

म्हणूनच तर गगनात पक्षी,
निळेपण त्याचे शोधण्यास;

गुणगुण प्रशांत सूरांची,
प्रवाह प्रियंवद नदीचा;

आभरण केलेले अग्नीने
धगधगे पहाटे स्वाहात;

करी प्रज्वलित मंत्रघोष
जोपासलेली ध्येयधारणा;

तीव्र इच्छा झाली बळकट
अशक्य आणण्या शक्यतेत;

येई ठरलेली नूतनता,
अपरिहार्य आहे रूपांतर;

स्मितनगरीचा रहीवासी
करी हे घरकूल तृप्तीचे;

आनंदध्वनी ओती रहस्य
श्रेष्ठ ईश्वरी सुभगतेचे;

अचेतन देह झाला जागा,
तळपे तो सूर्य पार्थिवतेत.

८ सप्टेंबर २०२५

## ५५: नसावा मावळणारा सूर्य

प्रबळ इच्छा की नसावा मावळणारा सूर्य,
नसावी गुणगुणारी नदी कोरडी कधीही;

भरगच्च धान्याने भरलेले आहे कोठार,
अंतःकरण समृद्धीच्या अमाप सौभाग्याने;

वाचनायलात ज्ञानविज्ञानांचे जाड ग्रंथ,
निळे आकाश आणि पाताळही गवसे तेथे;

जीव अडकलेला काळ्याशा कोळ्याच्या जाळ्यात
घेई पंख भरारीचे जाण्या मृत्यूच्या पल्याड;

नसे अंत संसाराला असो दिवस वा रात्र,
आत्मविश्वास न जुमानता कर्दनकाळही;

उंच चढे शिखर कठीण शिखरावरती,
ऐकत ऐकत वाणी अचानक आनंदाची;

तेजाळ ऐश्वर्य अरिष्ट भाकरतुकड्यातही,
पाहावे जेथे तेथे विपुलतेचाच थाटमाट;

झाले जागे बाळगलेले स्वप्न फार प्राचीन,
जन्मास येता सृजनता थोरल्या वैभवाची.

१३ सप्टेंबर २०२५

# ५६ः एका निःस्तब्ध रात्री

एका निःस्तब्ध रात्री अजूनही झोपलेली असताना स्वप्ने
शांततेच्या अभिव्यक्तीने आणली खूप मोठी खबर;
अहो, एका गूढ झेपेत झाला क्रूर काळा वाघ पराभूत,
दिव्यत्वाच्या प्रखरतेत उजळली फार पूर्वीची उत्कटता!

करूनी वार निर्णायक आदळला हातोडा बंद दरवाज्यावर
आश्चर्य की वाहत्या कालाच्या गतीत धावला मोद-हर्ष;
कल्पांची प्रतीक्षा बाळगून आशेने घोषित केलेली वेळ
आहे चमत्कार पाहणाऱ्या डोळ्यांच्या अगदी नजीकच;

जन्मास आले तेजोमय बहूशक्तिशाली अग्निबाळ,
हो, योगतपश्चर्येत त्रिप्रांतातील आनंदाचे वैभव ते;
सर्व जगांतील सर्व पुष्कराज आहेत मालकीचे त्याच्या,
अमृत शरीराचा गुणवंत महान टाकी व्यापून पृथ्वी.

सोनेरी-जांभळे-नारंगी शिखरावरून घेऊनि शिखर
आला तो झळकणाऱ्या श्रेष्ठ उच्चतम चैतन्यासह.

२३ सप्टेंबर २०२५

# ५७: वाऱ्याची मंगलदायी झुळूक

आली आहे वाऱ्याची मंगलदायी झुळूक,
पहाटेच, कल्पनेच्या उल्हसीत पूर्वेकडून;

गाता गाता झाले गाणे निश्चलतेचे वाद्य,
न उच्चारलेले शब्द प्रभावशाली स्तोत्र;

पाठी ठेवला होता अद्भुततेचा महामेरू,
चढता चढता गेली भरारी उंच अंतराळात;

तारकामंडळे धावती आणण्या अज्ञाताचे
अवर्णनीय प्रगाढ कीर्तिवैभव ह्या भूस्थळी;

गवसला तिला आनंद वाढत्या भगवंताचा,
जसे काही झाला हिरा तळपणारा सूर्यच.

३ ऑक्टोबर २०२५

# ५८: स्मिताचा आनंद मधुर चंद्रमातून

ओतला आहे मधुर चंद्रमातून स्मिताचा आनंद
कीर्ती वाढविण्या आल्हादी भविष्याचे जीवन;

गूढ उद्देशाने थोरले आभाळ झालेही विशाल,
नवीन चमत्कारांची उत्कृष्टता असावी म्हणून;

मार्ग जरी जायी महारात्रीच्या भयानकतेतून
ती तर बाळगे रहस्याची न संपणारी समृद्धी;

काळेकभिन्न स्वप्न जे धारी श्रीमंती शून्यता
आणे प्रत्ययास असलेली दिव्य आकांक्षा;

जावे कुठेपण दिसती देहरूपे त्या चैतन्याची,
प्रभाव बोलू लागला खडकाळ डोंगर देखील;

सौंदर्याचा कसबी शिल्पकार करी मूर्तिमंत
आविष्कराच्या प्रेरणेत अनिर्वचनियेलाही.

२५ ऑक्टोबर २०२५

# ५६: अस्मानी रंगाची स्फूर्ती

हो, काय झाले एकदा आली अस्मानी रंगाची स्फूर्ती,
डोळ्यात होते तिच्या सृष्टीच्या पलीकडचे पाहण्याचे;

धावत धावत आला थोरला डोंगर कल्पनेच्या वेगाने
व सौंदर्याची ख्यालीखुशाली सांगू लागले हर्षीत ओढे;

मोरपिसाऱ्यांचा थयथयाट, भावनांचे आल्हादी गीतगान,
दूरचित्रवाणी आणू लागली प्रफुल्लित आशांचे हारतुरे;

पहा की, चपळाईने येई प्रकाश अंधाराच्या गुहेतूनी,
ही अगाध करणी घडविण्याकरिता तर प्रपंच सारा;

दाट गढद छायेतून येईल आवेशी न विझणारी ज्योत,
राखेत होईल जागी धगधगणारी सोनियाची ज्वाला;

नका सांगू मागचे, जुने पुराणे, की देह भस्मच शेवटी,
अग्नीतर घडवी चैतन्यतनु जिंकूनी कठोर मृत्यूलाही;

येत आहे जवळ अनंताचा पळ राहण्या जवळ इथे,
घेई जन्म जेंव्हा अनादी दिव्यशक्ति पृथ्वीच्या गर्भी.

७ नोव्हेंबर २०२५

## ६०: अडगुळ मडगुळ सोन्याच कडगुळ

“अडगुळ मडगुळ सोन्याच कडगुळ,” सांग :
काल रात्री पडलेले स्वप्न होईल का खरे?

आला होता अचानक पक्षी खूप उंचावरुनी,
पंख किरमिजी, हो, झळझळीत नव्या तेजाचे;

म्हणे, जरी मी रहिवासी तेथला, सत्यानंदी,
पाहील आवेशाने होणारे वैभव न्यारे इथले;

आणि अवतरली चंदनी प्रार्थना ज्वालामंदिरी
शांतिमय देहात प्रफुल्ल आर्तता भविष्याची;

शोधाशोध नव्हे, शोध हा परिपूर्ण, मूल्यांचा,
प्रत्यक्षात असलेली थोरवी वाढवी थोरवी की;

आहेत इथे नृत्य-संगीत आलेले प्रशांततेतून,
अजब लय घेत श्वासोश्वास, आश्चर्याचे गूढ;

उखाणा नव्हे भाकीत नव्हे, वचन सत्यवृत्ताचे,
चक्षू स्मित-हर्षाचे बघत आहेत प्रेमच निव्वळ.

६ नोव्हेंबर २०२५

# ६१: हे पर्वत

आहेत हे पर्वत एका महान आत्म्याच्या लयी,
त्यांच्याच आकाशात असलेले शांततेचे गुपित;
वाढे ग्रीष्माच्या आनंदोज्वालेत त्यांची उंच उंचीः
भाळ मोठे, प्रशस्त, अबंधीत विचारांचे, तेजस्वी,
हृदय न जाणवलेल्या प्रेमाचे आमोदी कंपण,
आंतरिक हर्ष श्रद्धेच्या खडकावर स्थापलेले ते;
घेतात मुक्त मोकळा श्वास शाश्वत ऋतुऋतूत;
पाचूच्या फांद्यांचे, नीलमणी पानांचे वृक्ष, हो,
अस्तित्वाच्या पोकळीत लावले होते फार पूर्वी;
त्या गतिशील तंद्रीत, वेळ-काळाच्या ओघात
आलेत वाहत्या ओढ्यांचे गुंजन, सुवर्णी हास्य,
स्वप्नांच्या समुद्राला घेऊन जातीही दिवसाकडे;
प्रकाशमय विवेकी नदीने आणल्याप्रमाणे
देतात उत्कृष्ट हेतु जीवनाच्या येत्या सृष्टीला;
शून्यत्वाला ओलांडून रहस्यमय प्रेरणा की,
पोहोचतील अमरत्वाला हे हेम पर्वत पहाटेच.

## ६२: त्याचे ज्ञानाचे प्रकाशमन

केला अग्निने प्रवेश वधूच्या तिसऱ्या रात्रीच्या खोलीत आणि मिळवला विजय वासनेवर,
बनला मग तो जाणून जन्म भौतिक पदार्थवस्तुतील आत्म्याचा स्वामी, प्रतिष्ठापक;

स्वप्नांच्या शेंदरी गढद रंगाच्या पलीकडे घेतली चौखूर धाव प्रबळ श्वासाने, मेघगर्जनेसारखी,
जसे काही पसरलेला आहे दूरवर दूरवर बीजाच्या झोपेत ऐटी रूबाबदार अश्वत्थ विराटराज;

लवकरच आम्ही जीवनधारा चिकट स्पंदित होणाऱ्या त्या आकाशी लहानशा पदार्थापर्यंत पोहोचलो,
विचारांच्या पलीकडे, पलीकडे, रंगरंगीत, आले उंच चढत जाणारे ब्रह्मांड आमच्या निदर्शनास;

हिमालयाच्या तेजस्वी कन्येला इंद्राने केली प्रार्थना, स्मिताश्रीच्या उल्हासी आगमनाकरिता,
आणि ठिकठिकाणी अनंताची वाढत जाणारी शांतता झाली गोळा, ध्वनीच्या अर्थांमध्ये;

पहा, चातुरांशी, चतुस्पाद, दिसणारी त्याची मागची डावी टांग आहे लटकत अग्निदिव्यात,
तळपत्या सूर्याची सूवर्णमयी तेजःप्रज्ञा, आणि आहे प्रज्वलित ती सृष्टीत, ह्या प्रपंचातही;

त्या काळ्याकभिन्न खाडखाळी शाश्वत शांततेत उघडले गेले आहेत स्वर्गाचे अलौकिक नेत्र,
आणि म्हणून नाही परतत अग्नि, अकल्पनीय गोष्टींना घाबरून, पुरातन प्रचंड कठोरतेला;

व्यापले पवन-देवतेने अणू-ताऱ्यांचे महाविशाल अवकाश, हटवूनि तिन्ही काळाची रचना,
आणि जोडला गेला मृत्यू अमरत्वाशी, प्रेरणेच्या शक्तीने, विकासण्या नवनवे अमरत्वते;

आनंदाच्या पंखांची झंजुमुंजु वेळी आली परदेशातुनि न्यारी हंसांची अचंबित झुंडच्याझुंड,
आणि भरला प्रकटीकरणाच्या घाईने अमर्याद शून्याचा आत्मा, उकलुनी त्यातले रहस्य;

आम्ही केले अग्निला आवाहन आणि झेप घेऊन दिले त्याने वरदान अनपेक्षित यज्ञाचे,
मग हृदयाच्या माणिकातून उडी मारली भव्य इच्छाशक्तीने, जोपासण्या संकल्प थोरला;

आम्ही केले वायुला आवाहन आणि त्याने बड्याच्या सामर्थ्याने केली अश्वाची मागणी,
म्हणूनच तर नाकाच्या रंध्रांद्वारे घेते जीवन श्वास, जिंकूनि शर्यती, कठीण कठीण शर्यती;

आम्ही केले इंद्राला आवाहन आणि त्याने त्याच्या सहस्र मोत्याची माळ दिली एकाला,
आणि प्रकाशाच्या अचानकतेत आला तेजस्वी कळप पृथ्वीकडे, हुरूपाच्या चपळाईने;

आम्ही केले आवाहन थरारक मूळ शब्दाचे तेजःपुंज कांतिमान धडाडणाऱ्या पदार्थात,
आणि त्याच्या ज्ञानाच्या मनाने प्रज्वलित केला अजन्मा, युगाचा न ढासळणारा आनंद.

# भूमिकेचे भाकीत

काळ नव्हे, थोर अलौकिक प्रकाशमय मृत्यूने आपल्याला पुढच्या मार्गाने ऊज्वलतेकडे न्यावे. त्यात प्रकृतिधर्म आणि देहाची पार्थिवता चैतन्याला इच्छित असलेले स्वरूप घेतील. तेंव्हा एक देह मृत न होता दुसरा देह घेईल. उद्याचे आत्मज्ञान आणि काव्य हे अजमावून सांगेल. उदात्त आवाज आणि ओघ हे भारदस्त काव्याचे तेच वाङ्मयिन वैशिष्ट्य उंचावणारे प्रतिष्ठित वैभव ठरते. त्यात तीव्र उत्साह आणि धावता शब्दप्रवाह एकाच ठिकाणी येतात. ते जोरकस रीतीने यावे हे भाषेच्या क्रियाशीलतेकरिता आवश्यक आहे.

वेद आणि उपनिषदांच्या प्राचीन ऋषी-कवींनी मंत्र उच्चारण केले ते सर्वात अंतरंग आणि जवळजवळ गुप्त सत्य आहे ते पाहण्यासाठी. तिथे अंतर्ज्ञानी आणि प्रकटीकरणात्मक प्रेरणा मूर्त रूप घेते. ती एक सर्वोच्च लयबद्ध भाषा आहे. ती बनवलेली नव्हे अवतरलेली भाषा आहे, तिच्या अलंकारासहीत, तिच्या प्रगल्भ शब्दकोशातून, छंदशास्त्रातून, मूळ उद्गारासह.

खरे म्हणजे, अध्यात्म आता खूप पुढे गेलेले आहे, नव्या प्रखर चिद्विलासाच्या क्षमतेत, सामर्थ्यात, अग्नीच्या तेजाने दिव्य क्रियाशील शक्तीच्या विलासात, कार्यसिद्धीत, त्या उच्चतम प्रकृतीच्या समृद्धीत, त्या आविष्कारात. आशावादी दृष्टिकोनातून भविष्याच्या उज्वलतेतुन सांगायचे तर, त्यातच उन्मलीत होऊन नवीन काव्य वैभवी सौंदर्यशिल सृष्टीची निर्मिती करेल, ते अगम्य भोक्तेपण आस्वादिल. चिद्विलास हा चित्ताचा केवळ मनोरंजनाक खेळ किंवा लिला किंवा करमणूक नसून अनाकलनीय असले तरी प्रकटीकरणाचे प्रभावी कृतीदर्शन आहे.

श्रेष्ठतेचा असा पल्ला गाठण्याकरता मराठी भाषा संपन्न आहे का हा प्रश्न उद्भवणे साहजिकच आहे. आज तरी ते दिसत नाही. पण नाही म्हणून होणार नाही असे

नाही. अमृताच्या पैजा जिंकणारी मराठी त्याच्याकरता तयार होऊ शकते. त्यातच तिची पूर्तता आहे. अपेक्षा आहे की त्याकरिता लागणारी वागतपश्चर्या केली जाईल.

अधिष्ठात्याने आपल्या क्रियावाण धर्मिणीला पाचारण करून येथे मृत्युलोकी दिव्यत्वाचा बहुगुणी होण्याकरिता तर हे सर्व प्रयोजन मांडले आहे. विस्तारित परिमाणांमध्ये सर्जनशीलता अनंताचे अनंत पैलू पाहील, अजून विकसित करील. तेच त्याचे बहुगुणत्व. ते आणणारे काव्य मग होते त्याची स्तुतीगाथा. तिथे वाढतो आश्चर्यकारक अभिनव आनंदविलास.

१७ नोव्हंबर २०२५

# एक रसग्रहण

आपले कौतुक करावे तितके कमीच! मराठीतही आपण उत्कृष्ट काव्यकल्पना मांडून दाखवली आहे. ही आपली कविता उंच आकाशात म्हणण्यापेक्षा अंतरिक्षात घेऊन जाते.

चिद्विलासाचे रहस्य माऊली श्रीज्ञानेश्वरांनी आपल्या रचनांमध्ये, विशेषेकरून ग्रंथराज श्रीज्ञानेश्वरी व अमृतानुभव यांच्यात मांडलेले आहे. चिद्विलासवाद मांडण्यापेक्षा ... म्हणण्यापेक्षा चिद्विलासच प्रत्यक्ष प्रकट करण्याकरता व त्याचा रसास्वाद घेण्याकरता सातशे वर्षांपूर्वीची जुनी मराठी सुसंपन्न होतीच! तशीच ती आजही सुसंपन्न होईलच ... असेलच! पण माऊलीचे बोल ते माऊलीचे बोल! त्यांची सर कोणाला येणार आहे?

आपण चिद्विलासावरील आपल्या उदात्त विचारांचे अनुभूतिपूर्ण शब्दात प्रकटन आणि मंडण केले आहे. त्यासाठी आपले शतशः अभिनंदन आणि आपल्या पेन मधून अशीच उत्कृष्ट विचारधारा उदात्तरित्या प्रकट होईल अशी आशा करतो. ती अशीच होत राहावी आणि राहीलच असे म्हणण्यापेक्षा ... अपेक्षा करतो ... तशी करू शकलो तर! ... असे म्हणण्यापेक्षा अन्य काय म्हणू, ते म्हणतो.

आपल्या ऋषितुल्य पादपंकजांचे स्मरण व त्यांना नमन करतो ... आपली विचारसरणी नेहमीप्रमाणेच अनुभूतीपूर्ण, उदात्त आणि स्पृहणीय आहे.

विभाकर लेले
१७ नोव्हंबर २०२५